

# भगिनी निवेदिता

पु. पां. गोखले

इंद्रायणी साहित्य
पुणे

# भगिनी निवेदिता

लेखक : पु. पां. गोखले

मूल्य : ८० पैसे

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे

प्रकाशक :

**श्याम दयार्णव कोपर्डेकर**
इंद्रायणी साहित्य
१२५७ सदाशिव पेठ, पुणे २

♣

प्रथमावृत्ती : १९६७

♣


मुद्रक :

**रा. ना. सरनाईक**
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ, पुणें २.

# पहा तर खरे !

वैदिक धर्म म्हणजे हिंदुधर्म. माणुसकीचा उज्ज्वल धर्म तो. "कर्तव्य म्हणजेच धर्म; सेवा म्हणजे संन्यास. स्वतःचा पवित्रपणा म्हणजे अध्यात्म." असा हिंदुधर्माचा व्यापक अर्थ. तो एकसारखा समजावून दिला भगिनी निवेदितेने. स्वामी विवेकानंदांची ती शिष्या व मानस-कन्या. तिच्याइतके तरी, भारतीयांचे आपल्या देश-धर्मावर प्रेम नको का? ते कसे करावे हे तिच्याच गोष्टीवरून शिकण्यासारखे आहे. पहा तर खरे !

पु. पां. गोखले



जन्म इ. स. १८६७ ] ☆ [ मृत्यू इ. स. १९११

## १. अतिथीचा आशीर्वाद

इंग्लंडात मँचेस्टर येथील एका दारावर टक्-टक्-टक् आवाज झाला.

आणि दार उघडले. दारात एक महाशय दिसले. त्यांना घरधनीण म्हणाली, " या ना आत ! बसा जरा, येतील ते आत्ता इतक्यात ! "

आलेला अतिथी म्हणाला, " म्हणजे गुरू सॅम्युअल बाहेर गेले आहेत तर ! अन् ही कोण, त्यांची बच्ची वाटतं ! "

आई मेरीने खूण करताच सहा वर्षांची बाला पुढे झाली. तिने अतिथीला नमस्कार केला. " काय तुझे नाव बाळ ? "

" माझे नाव मार्गारेट नोबल. "

" वा ! वा ! काय तरतरीत आहे हो तुमची प्रियदर्शिनी ? आजोबा, वडिलांचे नाव काढील ! "

मेरीबाई गालांतल्या गालांत हसल्या. आर्जवून म्हणाल्या—" आपल्या सारख्या धर्मगुरूंचा तिला आशीर्वाद मिळावा. "

" हे काय सांगायला हवे काय ? " अतिथी म्हणाला—" आमचा आशीर्वाद आहेच तिला. अहो, ती हिंदुस्थानात जाईल अन् धर्मसेवा करून अमर कीर्ती मिळवील. "

खरा झाला हा आशीर्वाद. मार्गारेट मोठी झाली. २८ व्या वर्षी तिला एक महान् योगी भेटला. त्याची ती शिष्या झाली. हिंदुस्थानातही गेली. पण अतिथीच्या अपेक्षेच्या अगदी उलट ! ख्रिस्ती धर्माचा प्रचार ती करील, अशी होती अतिथीची मनीषा ! मार्गारेट हिंदुस्थानात आली, ती मात्र हिंदुधर्माच्या सेवेला ! !

## २. मार्गारेटला सांभाळ

मार्गारेट नोबल्चे वडील सॅम्युअल नोबल ! एक दिवशी पार थकले. वयाचा भार त्यांना आता सोसेनासा झाला होता. मार्गारेटला त्यांनी शिक्षण दिले होते. शहाणी केली होती. तिची कर्तबगारी पहावी अशी त्यांची फार इच्छा होती.

पण माणूस म्हणतो टक अन् दैव म्हणते दुसरेच काही तरी ! येथे असेच झाले. मार्गारेट सोळा वर्षांचीच होती. सॅम्युअल नोबल तिच्याकडे डोळे लावून बसले होते. पण प्रकृती बिघडलेली. त्यांना कळून चुकले की आपण फार थोडा वेळ आता हयात आहोत. त्यांनी मार्गारेटला काही काम सांगितले. ती कामाला गेली. ती बाजूस होताच सॅम्युअलनी तिच्या आईला जवळ बोलावले. हळूच सांगितले, " मेरी, माझे एक काम कर. मार्गारेटला नीट सांभाळ. तिच्या हातून एक फार मोठी कामगिरी व्हावयाची आहे. "

अन् सॅम्युअलने देवाची करुणा भाकली, डोळे मिटले अन् या जगाचा निरोप घेतला.

♠ ♠

## ३. विवेकानंदांची गाठ

सन १८९५, ऑक्टोबरची २२ वी तारीख. एकच दिवसाने मार्गारेट नोबलच्या वयाला २८ वर्षे होणार. त्या दिवशी लंडन येथे एक व्याख्यान झाले, हिंदुस्थानातील एका साधूचे. अडाणी, रानवट देश असे हिंदुस्थानाला विचारी इंग्रज मानीत. पण त्या देशातील साधूच्या व्याख्यानाविषयी २४ ऑक्टोबरच्या ' स्टॅण्डर्ड ' पत्राने म्हटले की—

" राजा राममोहन रॉय आणि केशवचन्द्र सेन यांच्या तोडीचे स्वामी विवेकानंदांचे व्याख्यान झाले." आपल्या वाढदिवसादिवशी मार्गारेटने हा अभिप्राय वाचला. मग पुढे दर रविवारी ती व्याख्यानास जाऊ लागली. लंडनमधील एका शाळेची ती मुख्य शिक्षिका होती. आपली आई अन् आपली दोन भावंडे यांचा सांभाळ ती करीत होती. या बाईच्या मनावर व एकंदर श्रोत्यांवर फार मोठा परिणाम झाला. विवेकानंदांनी ( मयि सर्वमिदं श्रोतं सूत्रे मणिगणा इव—७।७ ) ' मोती एका दोऱ्यात जसे गोवले जातात तसे माझ्यामध्ये सगळे काही गोवले आहे. ' या गीतावचनावर भाषण केले होते. पुढे पुढे विवेकानंदांना मार्गारेट उघड प्रश्न विचारू लागली. एकदा तिने उघड सांगितले की,—" आपले सर्व सांगणे मी समजून घेतले, पण त्याचा खरेपणा पटत नाही ! "

विवेकानंद उत्तरी म्हणाले—" कुणाचेही बोलणे विचार न करता खरे समजावे असे माझे सांगणेच नाही ! विचारांच्या मुळांशी जावे अशी इच्छा हवी ! प्रयत्न हवा ! ! मी ही गुरुदेव रामकृष्णांची सांगी घासूनपुसूनच घेतली. "

दिवसांमागून दिवस गेले. विवेकानंदांचे विचार सुंदर आहेत. खोल आहेत, हे मार्गारेटला हळूहळू पटू लागले. मगच ती विवेकानंदांना ' गुरू ' म्हणू लागली.

## ४. धर्म-शिक्षण

विवेकानंद फिरून १८९६ ला लंडनला गेले. मार्गारेट फिरून त्यांची भाषणे ऐकू लागली. ते उतरले होते त्या श्री. स्टर्डी यांच्या घरी ती जाई. स्वामींना अनेक प्रश्न विचारी. प्रश्नांवरून स्वामींना

कळून चुकले की—मार्गारेट ही साधी बया नाही. आग आहे ! ज्ञानाचे तूप त्या आगीला हवे ! !

एक दिवशी सभा संपली. एक म्हातारा विवेकानंदांना भेटला. म्हणाला—" व्याख्यान छान ! पण सारे जुनेच की हो ! ! "

मार्गारेटदेखील कान टवकारून उभी होती. तिला स्वामींचे उत्तर ऐकावयाचे होते. विवेकानंद त्या म्हाताऱ्या बाबाकडे हसत हसत वळले व गोड आवाजात बोलले, " मी इथे काही नवे सांगण्याकरिता आलो आहे कुठे बाबा ? जुन्यात जुने, पण खरे, तेवढे सांगेन म्हणून आलो. माझे सत्य हिमायलयापेक्षा जुने आहे. परमेश्वराइतके जुने आहे माझे सत्य ! पण ते ऐकणाऱ्यांना पटावे अन् त्यांना काही चेतना यावी, असे मला वाटते. तसे झाले तर मी काही ' भले ' केले. असेच मत होईल ना ? " मग तो बुढ्ढा गप्पच बसला. तरुण मंडळी आनंदली. मार्गारेटला एक नवी दृष्टी आली. एक दिवस स्वामी ' भक्ती '-वर बोलले. जे काही जीवन या जगात आहे, ते परमेश्वरमय आहे, असा त्यांचा विषय होता. ( ईशावास्यमिदं, सर्वं, यत्किंच, जगत्यां जगत् ) भक्तीची ही व्याख्या मार्गारेटला सुंदर व पूर्ण वाटली. विवेकानंदांनी नचिकेताची गोष्ट सांगितली. त्याचे वडील गौतम ऋषी. त्यांनी नचिकेत मृत्यूला अर्पण केला. नचिकेत यमाकडे ( मरणाच्या देवाकडे ) गेला. त्याने यमाकडून तीन वर मिळविले. त्यांत यमाने नचिकेताला शिकविले—' परमेश्वर अणुरेणूंत आहे. तसा तुझ्यातही आहे. अरे ! तोच तू आहेस. ( तत् त्वम् असि ) ' ही गोष्ट रसाळपणे विवेकानंदांनी सांगितली. ऐकणाराच्या अंगांवर शहारे आले.

विवेकानंदांच्या भाषणांतून लोकांना उमगले, शिक्षण पुस्तकी पोपटपंची नाही; शिक्षण पदवीपुरते नाही. शिक्षणाने शील विकासले पाहिजे. माणसाजवळ पूर्णता असते. ती विकासली पाहिजे व प्रगट

झाली पाहिजे; त्याचे नाव शिक्षण अन् धर्म; माणसात ईश्वरी गुण उमटले पाहिजेत; तरच तो धर्म !

## ५. हिंदुस्थानात मार्गारेट

विवेकानंदांनी लंडन सोडले; ते हिंदुस्थानात निघाले. १६ डिसेंबर १८९६ ही तारीख होती ती. परतण्यापूर्वी विंबल्डन येथे स्वामींनी वेदान्त-केंद्र उघडले होते. ते मार्गारेट पहात होती. वेदांचे ज्ञान तेथून लोकांना मिळे.

मार्गारेट व स्वामी यांची आता पत्रभेट होई. विंबल्डन येथील कामकाजाची माहिती ती तर दर महिन्याला विवेकानंदांकडे धाडी. ती महिन्याच्या महिन्याला प्रसिद्ध होई. ' ब्रह्मवादिन ' या मासिकात. रामकृष्ण आश्रमातर्फे ते मासिक निघे. पण मार्गारेटच्या मनात हिंदुस्थानात यावयाचे होते, पण २३ जुलै १८९७ रोजी स्वामींनी लिहिले—
" इंग्लंडमध्ये राहून तुमच्याकडून अधिक काम होईल. हिंदुस्थानासाठी, वैदिक संस्कृतीसाठी तुम्ही झीज सोसता, तिच्याबद्दल परमेश्वर तुमच्यावर उदंड कृपा करील. "

पत्र वाचून मार्गारेट मुसमुसली. तिने ओठ चावला, डोळे मिटले. विचार केला अन् कामाला लागली. तिने आपल्या घराचा विचार घेतला. आपल्या शाळेची व्यवस्था लावली. हिंदुस्थानात जाण्याचे ठाम ठरविले. भिंतींना कान होते. त्यांनी मार्गारेटच्या मनाचे ऐकले. श्री. स्टर्डी यांना हे कळले. त्यांनी विवेकानंदांना ते कळविले.

तेव्हा स्वामींनी २७ जुलै १८९७ ला मार्गारेटला पत्र लिहिले— हिंदुस्थानात यायचे मनात आहे, मग या. मोकळ्या मनाने सांगतो. तुमचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल. इथे बायकांसाठी काम करावयाला

एक सिंहीण हवीच आहे. तुमचे शिक्षण, तुमची तळमळ, तुमची स्वच्छ वागणूक, तुमचा विश्वास, आयरिश रक्ताचे गुण यांचा उपयोग येथे फार होईल. पण अडचण आहे ती आमच्या बायका तुमच्या गोरेपणाला बिचकतील, भितील अन् तुमचे गोरे लोक तुमचा धिक्कार करतील हीच. ती अडचण तुम्ही मानणार नसला तर स्वागतच आहे. मी मागाल ती मदत करीन. पण लक्षात असू दे की, हत्तीचे सुळे एकदा तोंडाबाहेर आले की परत तोंडात जाण्याची बात नाही. टाकले पाऊल माघारी पडता कामा नये ! कुठे इंग्लंड, कुठे हिंदुस्थान ! कुठे लंडन, कुठे कलकत्ता ! कुठे सुखात वाढलेला जीव अन् कुठे तपस्येचे कष्ट !

पण मार्गारेटने ते पतकरले. का ? तिचा पिंड ब्रह्म जाणण्याचा होता. तिची परंपरा रेव्हरंडाची होती. परमेश्वराची माया, हे नष्ट होणारे जग, हा परमेश्वरी शक्तीचा एक अविर्भाव आहे. त्यात गुंतून जाता कामा नये. देवाची भक्ती केली तर माया तरून जाता येते; संसार करूनही तो सुटतो; जगात नांदून, वावरून, जगासारखे वागूनही जगाच्या पार होता येते; परमेश्वराशी मिळता येते; देव जसा सगळीकडे आहे पण कुठेच दाखवता येत नाही, तसे माणसाने वागले पाहिजे. जे जे काही तेजस्वी आहे, त्याचे पूजन करायला हवे. ज्यांना जे जे कमी असेल, त्यांना त्यांना ते देऊन त्यांचा उणेपणा भरून काढला पाहिजे. आणि जे बरेवाईट प्रसंग येतील, ते ते परमेश्वराचे कृपाप्रसाद मानले पाहिजेत. वैदिक धर्माचे हे तप करायला मार्गारेटला हिंदुस्थानात यायचे होते. जाणून बुजून हे करण्यासाठी मार्गारेट २८ जानेवारी १८९८ रोजी हिंदुस्थानात येऊन पोचली.

## ६. स्वागत

हिंदुस्थानच्या किनाऱ्याला बोट लागली. आई अन् भावंडांना, आपल्या विद्यार्थ्यांना अन् मैत्रिणींना सोडून आलेली मार्गारेट कलकत्त्याचे बंदर आल्यापासून नजर उंच करून पहात होती. कोण तिला भेटणार जिव्हाळ्याचे ?

का बरे ? मार्गारेटने बोटीतून उतरून किनाऱ्यावर पाय ठेवला. प्रवाशांच्या स्वागतार्थ लोकांचे घोळके जमले होते. त्यांत मध्येच एक घोळका होता. त्यामध्ये एक भगवे वस्त्र पांघरलेली मूर्ती होती. होय, मार्गारेटच्या नजरेने हेरले की तेच तेच ! आपण ज्यांना गुरू मानतो तेच ते विवेकानंद.

आणि मार्गारेट चटकन पुढे झाली. भारतीय कुलवधूंप्रमाणे ती स्वामींना वाकून नमस्कार करायला लागली. इतक्यात तिच्या गळ्यात एक हार पडला. मोगऱ्यांच्या फुलांचा होता तो. मधूनमधून गुलाबांची फुले होती त्यात. विवेकानंदांबरोबरच्या संन्याशाने ते स्वागत केले होते. केवढी धन्यता वाटली तिला ! तिने विवेकानंदांना अन् त्या संन्याशाला नमस्कार केला आणि आशीर्वाद मागितला.

## ७. स्वप्न

श्रीरामकृष्णांच्या एका भक्ताकडे मार्गारेटला विवेकानंदांनी ठेवले. "उद्यापासून इथल्या कामाला सुरुवात; तुम्हांला बंगाली शिकवायला उद्या एक शिक्षक धाडतो" असे विवेकानंदांनी सांगितले. आणि ते आपल्या आश्रमात गेले.

त्या २८ जानेवारी १८९८ च्या रात्री मार्गारेटला स्वस्थ झोप लागली नाही. तिला एक स्वप्न पडले. स्वप्नात तिने पाहिले की—

किर्र किर्र झाडीचे एक दाट जंगल आपल्याभोवती आहे. मध्येच काही मैदान आहे. पण त्याच्याभोवती नदीच्या पुराचे पाणी थडकते आहे, धडकते आहे ! अशात एक ल्हानगा एकदम येतो, आपले बोट धरतो; अन् बेताबेताने चालवत नेतो. पावलापावलातील जंगलातील झाडे कुठे जातात कुणास ठाऊक ? त्यांची माणसेच होतात. तो माणसांचा समुद्रच मग तिच्या पायावर लोटांगण घेतो; तेव्हा मार्गारेट बोलू पहाते, पण जमतच नाही ! ! लोक पुढे पुढेच रेट्याने येतात. तिच्या गळ्यात माळांवर माळा चढवितात. मोगऱ्याच्या असतात त्या. जिकडे तिकडे सुगंध दरवळतो. अन् मार्गारेट जागी होते. आपण अंथरुणावरच आहोत, असे तिला आढळते.

ती विचार करते––काय या स्वप्नाचा अर्थ ? माझे भविष्य तर नाही ना मी पाहिले ? पण विचार करायला आता वेळ होता कुठे ? आपण ' साधक '—' परमार्थाची उमेदवार '—म्हणून हिंदुस्थानात आलो. आपल्या हाती साधना द्यावयाला एक ' वडील साधक ' यावयाचा ना ?

आणि ता. २९ जानेवारीला सकाळी साधक स्वरूपानंद आपल्या नव्या बहिणीकडे आलाच. त्याचे डोके मुंडलेले, त्यावर बोटभर शेंडी, अंगावर पांढरेशुभ्र कपडे असा स्वरूपानंद कातर व लाजाळू पावलांनीच मार्गारेटकडे आला होता. मार्गारेट बंगाली शिकणार होती त्याच्याजवळ. ती दप्तर घेऊन येईपर्यंत स्वरूपानंद उभाच ! ती आली; दोघे बसले. संथेला सुरुवात झाली.

मार्गारेटच्या तोंडाकडे न पहाताच स्वरूपानंदाने पहिला पाठ संपविला. काढता पाय घेताघेताच शिक्षक विद्यार्थिनीला म्हणतो—
" ही दोन पुस्तके ! एक आहे श्री भगवानांची वचने ! " " भगवान ? भगवान कोण ? ख्रिस्त का कृष्ण ? " उत्तर आले—" भगवान

श्रीरामकृष्ण परमहंस ! ! " त्यांच्या वचनामृतांचे तम्ही इंग्रजी भाषांतर करावयाचे आहे. जमेल तेव्हा, पण झक्क अन् लख्ख ! "

मार्गारेटच्या शिक्षणाचा आरंभ रामकृष्ण-वाक्सुधेपासून झाला. पहिल्याच दिवशी सुधेचे इंग्रजी करावयाचे काम आपणांस मिळाले, आपण स्वप्नात तर नाही ना ? असे मार्गारेटला वाटले. पण पुस्तकावर मस्तक ठेवून रामकृष्ण-सेवा पत्करली.

## ८. रामकृष्णजयंतीस नवा उपक्रम

मार्गारेट कलकत्यास आली, हिंदुसमाजात राहिली. तिचे भारतीयत्वाचे शिक्षण सुरू झाले. पण तिला भारतीयांनी सामावून नको का घ्यायला ? विवेकानंदांचे संन्याशी गुरुबंधू ते करायला जेथे बुजत, तेंथे सामान्य माणसाचे काय ?

विवेकानंदांनी मार्गारेटला बेलूर येथे नेले. एक दिवस तेथे आपल्या सगळ्या मंडळींचे संमेलन भरविले. गुरुभाई होते, शिष्य होते, स्नेही होते. पूर्वेकडचे शिष्य होते, तसे पश्चिमेकडचेही शिष्य होते. त्यांत मार्गारेटही होती. आली ना पंचाईत ? सोवळ्याओवळ्याच्या, स्पर्शा-स्पर्शाच्या जुनाट कल्पना त्या वेळी सर्वत्र रूढ होत्या. समाजात बायकापुरुषांनी एकमेकाला कुशल विचारणारे प्रश्न करणेही त्या वेळी पाप मानले जाई. मग बाकीच्या गोष्टींची बातच कशाला ?

फेब्रुवारी ता. २७ सन १८९८ रोजी रामकृष्णजयंतीच होती. त्या दिवशी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, जे कोणी येतील, त्याची मुंज करण्याचा घाट विवेकानंदांनी घातला. ५० लोक आले. त्यासाठी गंगेची आंघोळ त्यांनी केली. विवेकानंदांनी त्यांना जानवी घातली. गायत्री मंत्र दिला. शेवटी स्वामी म्हणाले, " प्रत्येक हिंदू हा सर्व

हिंदूंचा भाऊ आहे. पंथ, पक्ष अन रूढी यांची भांडणे आता बंद. आशा आणि आनंद हे आता आपण फुलवू या. परधर्मीयाला सुद्धा हिंदुत्वातील सर्वश्रेष्ठ संस्कार करून घेता येतील. (कृण्वन्तो विश्वमार्यम्) सगळे जगच आर्य करून सोडा, अशी वेदांची आज्ञा आहे. अनार्य किंवा म्लेंच्छ कोण ? जो जातपात आणि जन्म यांच्या अहंकाराच्या कोशात मग्न असतो तो ! आणि आर्य ? श्रेष्ठ व चिरंतन सत्याची पूजा करतो तो आर्य.

मार्गारेट मग दक्षिणेश्वरास गेली. रामकृष्णांच्या जागेचे तिने दर्शन घेतले. देवळाला प्रदक्षिणा घातली. तिची मैत्रीण मुल्लर ही भगवी साडी नेसली होती. तो तिला अधिकारच काय ? अशी लोकांत कुजबूज होती. मग तिला किंवा मार्गारेटला देवळात कोण येऊ देतो ? रामकृष्ण जणू या भूतलावरच आहेत, अशी त्यांच्या खोलीची व्यवस्था पाहूनच त्या दोघींनी संतोष मानला.

## ९. ओळख

कलकत्यातील स्टार रंगगृहात विवेकानंदांनी ओळख सभा घेतली. ११ मार्च १८९८ रोजी येथील जनतेला पाश्चिमात्य शिष्यांचा परिचय स्वामी करून देत होते. गर्दी तुफान होती, मार्गारेटची ओळख करून देताना स्वामी म्हणाले, “ कु. मार्गारेट नोबल म्हणजे इंग्लंडने आपणांस दिलेली अमोलिक देणगी आहे. ”

लोक चुळबुळू लागले. ही मिशनऱ्यांची जात ! यात इंग्लंडचा कावा तर नसेल ? लोकांची नाडी मार्गारेटने त्यांच्या चेहऱ्यांवरून ओळखली. उत्तराच्या भाषणात ती म्हणाली, “ सहा हजार वर्षांची परंपरा आपल्या पाठीशी आहे तिला थोडा कोठे पोचा असला तरी

टीच नाही. त्या सनातन परंपरेतून आपण आध्यात्मिक, धार्मिक रत्ने जतन करून ठेवली आहेत ! मी भारतात आले आहे, ती या भूमिची, येथील लोकांची सेवा करण्यासाठी. सेवेतून मला एखाद्या लहान मुली-सारखे शिकायचे आहे--अध्यात्म; भारतीय संस्कृती, हिंदुधर्म. मी हिंदू म्हणून राहणार आहे. ज्या आस्थेने आपण माझे स्वागत केलेत तिचे स्मरण मी कृतज्ञतेने करीत राहीन अन् येणाऱ्या अडचणी ओलांडून जाईन. आपणही मला संभाळून घ्या. श्रीरामकृष्णांचा विजय असो."

टाळ्यांचा कडकडाट झाला. कोणी कोणाला जिंकले? छे: ! तसल्यापैकीं तो आनंद नव्हताच मुळी ! "चित्ताशी चित्त जुळे ! हृदयाशी हृदय मिळे ॥" याचा तो आनंद होता. "भिन्नभाव लोपला" होण्याची ती नांदी होती.

♠ ♠

## १०. शारदामातांचा प्रसाद

हिन्दू विधवा नवऱ्याच्या नावासाठी केवढे तप करतात हे पश्चिमेच्या बायकांना कसे कळणार ? हिंदू विधवा संन्याशापेक्षा संन्यासी होत्या त्या काळी ! त्यांना पाहून धक्काच बसायचा युरोपातल्या बायकांना. अन् युरोपियन बायांना जवळ येऊ द्यायला हिंदू बायका कोठे तयार होत्या ? त्यांना तो सारा "भ्रष्टाचार"च वाटायचा ! !

पण विवेकानंदांनी एक योजना आखली. १७ मार्च १८९८ रोजी मार्गारेटला तिच्या दोन युरोपियन मैत्रिणींबरोबर श्री शारदादेवींच्या दर्शनाला पाठविली.

मार्गारेट हलक्याच पावलांनी श्री शारदादेवींच्या आतल्या खोलीत गेली. तेथे दहा बायका जमिनीवर बसल्या होत्या. शारदामाता एका चटईवर बसल्या होत्या. माताजींनी मार्गारेटचे तिच्या मैत्रिणींसह नुसत्या

नजरेनेच स्वागत केले. इतक्यात कोणीतरी तीन चटया अंथरल्या. त्यांच्यावर माताजींची खूण होताच, तिघी पाहुण्या बसल्या. शान्त, पवित्र वातावरण होतं तिथे !

एका मोठ्या ताटातून दुधाच्या वाट्या, फळे, मिठाई आली. माताजींचा पहिला प्रसाद ! तो पाहुण्यांनी घेतला, पण माताजींनीही सहभागी व्हावे म्हणून विनंती केली, अन् काय आश्चर्य आहे ! माताजींनीही त्या युरोपियन स्त्रियांच्याबरोबर फलाहार केला !

एका दुभाषी बाईच्या मार्फत शारदामातांनी पाहुण्यांचे क्षेमकुशल विचारले ! मनमोकळ्या प्रश्नोत्तरांनी प्रसन्नता पसरली. इतक्यात स्वामी विवेकानन्द आले. उंबऱ्यावर डोके ठेवून स्वामींनी भूमीला वन्दन केले. आत येऊन माताजींना साष्टांग नमस्कार घातला, आणि आपल्या युरोपियन शिष्यांसह निरोप मागितला. माताजींनी मार्गारेटला “ माझ्या मुली, तुला माझे अखंड आशीर्वाद ” म्हटले.

मार्गारेट व तिच्या मैत्रिणी या गंगाकाठी बेलूरच्या मठात परतल्या. त्यांच्याबरोबर गोपालेर माँना ( गोपाळच्या आई ) शारदामातांनी पाठवून दिले होते. सनातन्यांतील सनातनी आजी या. मार्गारेटला सांगासवरायला त्या आल्या होत्या. “ उपनयन ” व्हायचे होते ना ?

♠ ♠

## ११. दीक्षा

मार्गारेटचे उपनयन ! २९ मार्च १८९८ या दिवशीचा हा मुहूर्त होता. मार्गारेट आज नवा जन्म घेणार, “ द्विज ” होणार होती.

नीलाम्बर मुखर्जींच्या उद्यानात रामकृष्ण आश्रम होता. “ अरुणोदय ” झाला अन् सगळे गुरुभाई सभामंडपात ध्यानाला बसले. गाभाऱ्यात मार्गारेट व तिच्या मैत्रिणी ओल्बुल व हेन्रीएटा मुल्लर उभ्या होत्या.

स्वामी विवेकानंद थोड्याच वेळात त्यांच्याकडे आले. मार्गारेटने त्यांना साष्टांग दंडवत घातला. स्वामींनी आशीर्वाद दिले, तिच्या मस्तकी विभूती लावली, सभामंडपातून धीरगंभीर स्वर दुमदुमले.

**असतो मा सद्गमय ।**
**तमसो मा ज्योतिर्गमय ।**
**मृत्योर्मामृतं गमय ।**
**आविराविर्म एधि ।**
**रुद्र यत्ते दक्षिणं मुखं तेन मां पाहि नित्यम् ।**

हे परमात्मन्, अभावातून भावात; वाइटातून चांगल्याकडे मला ने, अंधारातून प्रकाशाकडे मला ने, मरणापासून चिरंजीवित्वाकडे मला ने. हे जगज्जननी, शक्तिदेवते, तुझ्याच प्रेमसुधेने सर्वस्व भरून जाऊ दे. तुझा आश्रय सदैव माझे रक्षण करो.

मार्गारेटने गुरुचरणी अभिवादन केले आणि आपले उरलेले आयुष्य वाहिले. मार्गारेटचे हे समर्पण होते, आत्मनिवेदन होते. तिला आता स्वतःचाच लोभ नव्हता. मग कुठला आला आहे इंग्लंडचा, आयर्लंडचा ? अस्मिता, मीपणा यांचा होम झाला. आता मार्गारेटचे " स्व " म्हणजे कुंभाराकडची माती ठरली. ब्रह्मचारिणीची दीक्षा मार्गारेटने घेतली. जुने पर्व संपले, जुने नावही तिने टाकले. गुरुचरणी तिने आत्मनिवेदन केले ना ? उघडच तिचा नवीन जन्म झाला. स्वामीजींनी तिचे नवे नाव ठेविले " निवेदिता " ! लोक तिला भगिनी निवेदिता म्हणू लागले.

स्वामीजी निवेदितेला व तिच्या मैत्रिणींना घेऊन सभामंडपात आले. सभामंडपात सर्व संन्यासी, गुरुभाई उभे होते. त्यांनी त्या सर्वांवर " सर्वमंगलमांगल्य " उधळली. सर्वांना प्रसाद वाटला. सर्वजण ईशचिंतनाला बसले. विवेकानंदांनी शिवरूप धारण केले. हाती तंबोरा

घेऊनं ते शिवपार्वती स्तोत्रे गाऊ लागले. शुचिता, निष्ठा, भक्ती यांच्या कल्लोळातून एका तासाभराने सर्व बाहेर आले.

निवेदिता आपल्या मठाकडे जाण्यास निघाली. स्वामी विवेकानंद तेव्हा म्हणाले, "मी भगवान रामकृष्णांचा दासानुदास आहे. त्यांचे अपुरे कार्य पुरे होईपर्यंत मला विश्रांती नाही." स्वामींनी मग बेलूरच्या दिशेस बोट केले व आपल्या नवदीक्षित कन्येला ते म्हणाले, "निवेदिते, त्या जागी स्त्रियांचा एक आश्रम हवा. पक्ष्याला दोन पंख असतात. हिंदुस्थानला ध्येयनिष्ठ पुरुष व ध्येयनिष्ठ स्त्रिया दोन्ही हवीत. तुला आशीर्वाद आहेत. तुझ्याहातून ते कार्य घडो."

♠ ♠

## १२. वेदान्ताने सेवायोगाची साधना

प्लेगची साथ दुसऱ्या खेपेस १८९८ साली सुरू झाली. जांघेत गाठ उठायची, ताप भरायचा आणि माणूस मरायचे ! अगदी विजेचे बटन दाबल्यासारखे हे सर्व झटकन होई. रोग हटविण्याचे प्रयत्न सरकारी होते. पण उपायापेक्षा अपायच त्यांनी अधिक होत. पुण्याला काय अन् कलकत्याला काय ! कुठेही गेले तरी पळसाला पाने तीनच ! !

कलकत्याला सरकारविरुद्ध दंगे उठतील अशी भीती निर्माण झाली. म्हणून सरकारने सैन्य आणले, प्लेगवर उपाय-उपचार करायला ! ! स्वामी विवेकानंदांना कसे स्वस्थ राहवणार ? प्रकृती नीट नसतानाही भगिनी निवेदितांना घेऊन त्यांनी पीडित-साहाय्यकेंद्र उघडले. लोक सहकार देऊ लागले. हिंदू आचारविचारांना धक्का न देता प्लेगवर विज्ञानाने सांगितलेले उपाय होऊ लागले. घरोघर जाऊन ती झाडणे, सारवणे, प्लेग झालेल्यांना दवापाणी देणे, ही कामे प्रेमाने होऊ लागली.

वेदान्त ही अंतराळातील शुष्क चर्चा नसून दैनंदिन सेवायोगाची साधना आहे, हे निवेदितांना पटले.

♠ ♠

## १३. शारदाश्रमात निवेदिता

प्लेगची धामधूम संपल्यानंतर निवेदिता आणि स्वामी गुरुभाईसह काश्मीर, हिमालय, अमरनाथांची पदयात्रा करून आले. ऑक्टोबर १८९८ च्या मध्यानंतर निवेदिता कलकत्यास आली. ती थेट शारदा-माताजींच्या आश्रमातच गेली, माहेरी मुलगी यावी तितक्याच सहजपणे !

विवेकानंदांनी तिला कोपऱ्यातील जागा मिळवून दिली. कारण शारदाश्रमाला निवेदितांनी माहेर मानले. तरी मूळ माहेरच्यांनी ह्या दत्तक मुलीला आपल्यातील मानायला नको का ? माताजींशिवाय कोणीही तिला विचारत नव्हते. पण निवेदितांनी तेथील कठोर व्रते आचरून दाखविली. पहाटे ४ वाजल्यापासून ६ पर्यंत जप, मग सडा-संमार्जन व स्नान, नंतर माताजींचे पाळीने दर्शन. त्यामागून श्रीराम-कृष्णांच्या प्रतिमेचे पूजन, ध्यानाभ्यास, भजन, आरती नंतर कुंकुम आणि माताजींच्याजवळ मौनव्रताने अकरा वाजेपर्यंत ध्यानधारणा, मग जेवण आणि दुपारी पुराण, सतारवादनाने सायंप्रार्थना, आरती, ध्यानधारणा, निद्रा अशी दिनचर्या असे. एक पंधरवडाभर काटेकोरपणाने या सर्व कार्यक्रमांत निवेदिता कसास उतरल्यावर शारदाश्रमाच्या पलीकडेच एका घरात निवेदिता रहावयास गेली.

नव्या घरात तिने अभ्यासिका थाटली. स्वयंपाकासाठी मडकी आणली. तळमजल्यावर तिने एक शिशुमंदिर सुरू केले; दुसऱ्या मजल्यावर परमार्थसाधनाची सोय केली. सत्य, शिव, सुंदर अशी रहाणी आणि निर्मळ जीवन, जसे काही गंगामाईचे पाणीच !

निवेदिताच्या घराला मग आश्रमाचेच रूप येऊ लागले. संयम, शील, सत्कृती, सद्उक्ती व सेवा हे आश्रमाचे पंचशील होते. रामकृष्ण मठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थेखालीच निवेदितेचा आश्रम चाले. त्यामुळे विवेक आणि आनंद यांचे अनुभवच तेथे भेटणारांना येत. निवेदिताने असे गुरुचरित तेथे केले.

## १४. निवेदिताश्रम

निवेदिताच्या आश्रमाचे व्यवस्थापक स्वामी सदानंद होते. कडक शिस्तीचा हा संन्यासी ! सायंकाळी निवेदिताला ते रामायण, महाभारत गोष्टीरूपाने सांगत. अग्नीत तूप का ओतायचे ? देवास शेंदूर का फासायचा ? अशांसारखे प्रश्न निवेदिता त्यांना विचारी.

वाघबाजारातील बोसपारा गल्लीत निवेदिताचे घर ऊर्फ आश्रम होता. ती हळूहळू तेथील प्रत्येक दुकानदाराला ओळखू लागली. प्रत्येक स्त्रीच्या परिचयाची झाली. प्रत्येकाला निवेदिता आपल्या परिवारापैकी वाटू लागली. एके दिवशी संध्याकाळी घुसली की एक बाई आश्रमात ! म्हणू लागली— " अहो, माझ्या धाकट्या मुलीला यम ओढून नेतोय यम ! तुम्ही येता का घरी ? "

निवेदिता तिच्याबरोबर गेली. यमाने आपले काम अगोदरच आटोपले होते. मग तेथे दुःखाशिवाय काय असणार ? तरी रात्रभर निवेदिता तेथे राहिली. " मरणाला घाबरू नये," जन्म ऊर्फ शरीर बदलण्यासाठी तुमची लेक जरा लांब गेली आहे. आपण नाही का पातळ बदलत ? आडोशाला जात ? तशीच ती गेलीय ! नवे पातळ नेसून, नवे शरीर घेऊन ती लवकरच परत येईल." असे गीतेचे तत्त्वज्ञान सोपे

करून निवेदिताने सांगितले. अन् कसेबसे त्या घरातील मंडळींचे सांत्वन केले.

निवेदिता दुसऱ्या दिवशी सकाळी आश्रमात परत आली. रात्रभर ती त्या घरात सेवा करीत होती. स्वामींना हे कळले. ते म्हणाले, "यासाठीच श्रीरामकृष्णांचा, माझ्या गुरूंचा, देवाधिदेवांचा अवतार होता. प्रत्येकाला त्याच्या त्याच्या भाषेत सांगितले पाहिजे. मृत्यूवर प्रेम कर; भीषणाचीही पूजा कर. कारण तीही परमेश्वराची रूपे आहेत. विषाला सुद्धा परमेश्वर मानले कयाधूने आणि प्रल्हादाने. म्हणूनच तिच्या माय-हृदयाला मुलास विष पाजताना आणि आईच्या हातून विष पिताना प्रल्हादाला काही भीती वाटली नाही. म्हणून प्रल्हाद मरणाला मारून उरला. माणसाला अमर होता येते ते विश्वरूपातील भीषणाचीही भक्तिभावाने पूजा करून !" निवेदिताची भावसमाधी लागली.

## १५. बालिका विद्यालय

दिपवाळीचे दिवस. आश्विन वद्य अमावस्या. १२ नोव्हेंबर १८९८. सगळ्या हिंदुस्थानभर हा लक्ष्मीपूजनाचा दिवस. कमावले किती, गमावले किती यांचा आढावा हिशोबी व्यापारी घेतात. बंगालात या दिवशी कालीपूजन करतात. आनंदीआनंद असतो. निवेदितेच्या आश्रमात त्या दिवशी शारदामाता आल्या. त्यांनी बालिका विद्यालयाचे उद्घाटन केले. दुपारची तीनची वेळ होती. स्वामी विवेकानंद व स्वामी ब्रह्मानंद हजर होते. प्रथम रामकृष्णांच्या प्रतिमेची पूजा केली. मग मंगलहोम झाला. माताजींनी शुभाशीर्वाद दिले. विवेकानंदांनी नाव ठेवले.

पहिल्या दिवशी शाळेत इन् मिन् तीन मुली. त्याही लाजऱ्या अन् बुजऱ्या. त्यांच्याकडे कुणी पाहिले तरी डोळ्यांतून टिपे गळायची. पण

१८९९ च्या रामकृष्ण जयंतीपर्यंत तीनच्या तीस मुली झाल्या. लहान-मोठ्या, लग्न झालेल्या, प्रौढ, विधवा अशा सर्वजणींना तेथे प्रवेश होता. निवेदिताने समाजाशी राखलेल्या सलोख्याचे ते रूप होते. तेथे शिक्षण राष्ट्रीय होते, नवीन होते, अद्ययावत् होते. इतिहासातील वीरकथा सांगत, चित्रे काढून रंगवून घेत. मातकाम शिकवीत. या सर्वांतून नवा इतिहास घडवायचा हे ठरवीत. प्रत्येकातील परमेश्वर प्रगट करावयाचा हे सांगत. प्रत्येक समारंभ वेदांतांनी संपन्न करीत. गाई, कुत्री, मांजरे यांपासून काय शिकावे, ते समजावून देत. शिवणे, भरणे, विणणे, सारवणे यांतून माणसांचे अंतरंग दिसते. त्यांतून समाजसेवा केली पाहिजे. हे ध्येय शिकणाऱ्यांच्यापुढे ठेवीत. गोर-गरीब, गरजू, आजारी, लुळे यांची सेवा म्हणजे परमेश्वराची सेवा, असा धडा देत. मन आणि मेंदू यांचा सहकार म्हणजे व्यवहार हे शिकणारात बिंबवीत. देह आणि देव यांच्यामध्ये देश आहे, हे विसरता कामा नये, असे बजावीत. असे करता करता शहाणे होण्याचे व शहाणे होता होता करीत राहण्याचे पाठ हे त्या विद्यालयाचे मुख्य लक्षण होते. हसत खेळत शिक्षण ही तेथील पद्धती होती.

काश्मीरच्या महाराजांनी या विद्यालयास आठशे रुपये दिले. जनता-जनार्दनाचा प्रसाद असाच मिळत गेला.

## १६. ही माणुसकी ! हा हिंदुधर्म !

विवेकानंदांची शिष्या निवेदिता. ती स्वामीजींच्या बरोबर अमर-नाथाच्या यात्रेला गेली होती. त्या निवेदितेला—मूळची ती आयरिश—तिला पहाडातून कसे चालवणार ? म्हणून तिने डोली ( दन्डी ) केली होती. पण एक जख्खड म्हातारी तिने अमरनाथाच्या यात्रेकरूंत पाहिली.

काठी टेकीत टेकीत जाणारी ती आजी! तिचा थरकाप होत होता पहाड चढताना. निवेदिताने ते पाहिले. चटकन ती उतरली आपल्या डोलीतून. यात्रेकरू आजीची तिने आर्जवे केली; आपल्या डोलीत तिला बसवून, निवेदिता स्वतः पहाड चढू लागली. विवेकानंदांनी तिला विचारले, " मार्गारेट, हे काय ? "

तोपर्यंत व पुढेही काही काळ ती मार्गारेट नोबलच होती. पुढे स्वामीजींनी तिला दीक्षा दिल्यावर ती भगिनी निवेदिता झाली. मार्गारेट नोबलने स्वामीजींच्या प्रश्नाला उत्तर दिले —" ही माणुसकी; हा हिंदू धर्म. " आपण स्वतः त्या म्हातारीला डोलीत बसवून, दोन घोंगडी पांघरून व त्यांचेच अंथरूण-पांघरूण जमिनीवर करून विश्रांती घेण्यात मार्गारेट नोबल सुख मानीत होती; अशी ती उतरली विवेकानंदांच्या कसाला व मग हिंदू ब्रह्मवादिनी झाली.

♠ ♠

## १७. कालीमंदिरात प्रवचन

निवेदिता आता सर्वथैव हिंदू झाली होती. लोकमताला ते पटले होते. म्हणूनच २८ मे १८९९ रोजी कालीघाटावरील कालीमातेच्या पुजाऱ्यांनी निवेदिताचे प्रवचन मंदिरात करविले.

ऐकणारांत कालीचे भक्त होते. कालीपूजा राक्षसी मानणारे सुधारक होते. लहान-मोठे स्त्री-पुरुष होते. निवेदिताने सुरुवात केली. ती म्हणाली, " निसर्गाशी एकरूप होण्याची धडपड कालीपूजनात आहे. पंचमहाभूतांच्या खेळात परमेश्वर पाहण्यात हिंदुधर्माचे मन रमते. एका हाताने अशी वर्दी देणारी, दुसऱ्या हाताने संहार करणारी, प्रकाश आणि अंधार या दोघांनाही जन्म देणारी, दया, क्षमा करणारी व जरूर तर कठोर दंड देणारी, सज्जनांचे रक्षण करणारी आणि दुर्जनांची व

राक्षसांची शिरे गळ्यात घालणारी काली म्हणजेच विश्वशक्तीचे परिपूर्ण रूप. अद्वैताकडे ती माणसाला नेते. कालीपूजनाचा खरा अर्थ लोकांना या प्रवचनातून कळला.

## १८. निवेदिता ब्रह्मवादिनी

१८९९ च्या प्लेगमध्ये निवेदिताने बोसपारा गल्लीतील रस्ते झाडले, गटारे साफ केली, प्लेगचे रोगी जवळ घेऊन शुश्रूषा केली. एकदा एक मुलगा मांडीवरच देवाघरी गेला. ८ वर्षांचा तो बाळ आई आई म्हणून निवेदिताच्या गळा पडला अन् इहलोकातून गेला. त्यामुळे निवेदिताने चांगलीच हाय खाल्ली ! मृत्यूचेही स्वागत करण्याची तयारी आपली अजून व्हायची आहे, हे तिला कळून चुकले.

तिने मनाची तयारी केली. " जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवन्त ॥ " ही तयारी होण्यापूर्वी एक तयारी व्हावी लागते. " जन नोहे जन हा जनार्दन। " असे वाटावे लागते. जनसेवा ती ईश्वरसेवा हा बोध मनी उरावा लागतो. तेवढी निवेदिताची तयारी झाली होती. म्हणून २५ मार्च १८९९ रोजी निवेदिताला ब्रह्मचारिणीची अन्तिम दीक्षा द्यावयाचे स्वामी विवेकानंदांनी ठरविले.

श्रीरामकृष्ण मठाच्या मंदिरात सकाळी ८ वाजता निवेदिता आली. विवेकानंद आले. शिष्येला त्यांनी बुद्धचरित्र सांगितले. बोध दिला की, " मोक्ष नव्हे वैराग्य, आत्मसाक्षात्कार नव्हे तर आत्मसमर्पण : हे आता जीवनध्येय. "

मग निवेदिताने शिवपूजा केली. विवेकानंद महिम्न म्हणत होते. आईने मुलीला शिकवावे, तसा गोडवा होता त्यांच्या आवाजात.

पूजा आटोपली. गुरू व शिष्य सभामंडपात आली. यज्ञकुंड प्रज्वलित होते. वैदिक मंत्र संन्यासी म्हणत होते. यज्ञाच्या अग्नीसमोर निवेदिताने प्रतिज्ञा घेतली, " तन मन धनाने मी पवित्र राहीन. गरिबी हीच माझी सोबतीण राहील. अहंकार आणि बुद्धी यांसह मी सर्व भावभावना व्रतस्थ करीन. मरणसुद्धा मला माझ्या सेवायोगापासून ढळवू शकणार नाही. "

प्रतिज्ञा झाली. निवेदिताने विवेकानंदांना साष्टांग नमस्कार घातला. स्वामींनी आशीर्वाद दिले. यज्ञकुंडातील भस्म निवेदिताच्या कपाळी लावले. सर्व संन्याशांनाही स्वामींनी भस्म लावले. मग म्हणाले, " सर्वस्वाहुतीचे हे भस्म ! सर्व सभामंडपात आवाज उठला—" अग्नये स्वाहा अग्नये इदं न मम । " अग्नीलाच अर्पण असो, आता हे अग्नीचे आहे, माझे नव्हे.

निवेदिता म्हणाली, " अग्निदेवा, पावित्र्याचे तेज तू पसरवितोस. वृक्षांनो, तुम्ही जिवंतपणा प्रकट करता. आकाशा, तू केवळ शांतिदेवता आहेस. स्वामी महाराज, सद्गुरो, आपल्यासमोर मी माझे म्हणून जे काही आहे ते सर्व या होमात अर्पण करून टाकले. अग्निनारायणा, या माझ्या समर्पणाचा स्वीकार करा.

हरिः ॐ तत् सत् ! हरिः ॐ तत् सत् ! साधक मंदिराबाहेर पडू लागले. एका वयस्क संन्याशाने जाता जाता निवेदिताचे पादवंदन केले.

♠ ♠

## १९. आईचा आनंद

विवेकानंदांची प्रकृती बिघडली. त्यांना हवापालट करायचा होता. ते अमेरिकेस निघाले. बरोबर भगिनी निवेदिता व स्वामी तुरियानंद

होते. ही मंडळी प्रथम लंडनला पोहोचली. निवेदिता आपल्या आईकडेच उतरली. स्वामींची सोय शेजारीच एका बंगल्यात झाली.

स्वामी विवेकानंदांच्या शुश्रूषेसाठी अमेरिकेहून श्रीमती फंक व ख्रिस्ताईन आल्या. भगिनी निवेदितापासून त्या चार पावले दूर राहायच्या. हिची आदब राखण्यासाठी ते होते. ख्रिस्ताईनची व निवेदिताची ती प्रथमच सहवास-संधी होती. पण दृष्टभेट होताच निवेदिता ख्रिस्ताईनला म्हणाली, " सद्गुरूवरील तुझ्या प्रेमामुळे तू मला मनापासून आवडतेस. तुझी माझी आजपर्यंत प्रत्यक्ष ओळख नसेल ! पण तुझ्यामाझ्यात फरक काय ? गुरुसेवेत आपण दोघी सहकार करू. " मग ख्रिस्ताईन विरघळण्यास काय उशीर ? आपल्या कन्येच्या हृदयाची ही विशालता मेरी नोबलनी पाहिली. त्या म्हणाल्या, " ख्रिस्तासारखा थोर ( विवेकानंद ) गुरू भेटला, म्हणून मार्गारेट ( निवेदिता ) सेवायोगी झाली आहे. धन्य ती, धन्य आमचे कुळ आणि धन्य आम्ही ! हे पहायला तिचे वडील हवे होते ! " मेरीबाईचे डोळे पाणावले.

ऑगस्ट १७ तारखेस स्वामी विवेकानंद अमेरिकेस गेले. स्वामींच्याच सांगण्यावरून निवेदिता लंडनमध्ये राहिली. तिच्या बहिणीचे लग्न ठरले होते. ते उरकले, नव्या वधूवरांना " नांदा सौख्यभरे ! " म्हणून आशीर्वाद झाले; लगेच मेरी नोबल लेकीला म्हणाल्या, " मार्गारेट, आता तू खुशाल गुरुसेवेस जा. परमार्थात तू बापसे बेटी सवाई होत आहेस. "

निवेदिता सप्टेंबर १८९९ च्या शेवटच्या आठवड्यात न्यूयॉर्क येथील हडसन नदीच्या काठी श्रीमती लेगेट यांच्याकडे आली. गुरुशुश्रूषेलाही लागली.

## २०. सेवा-स्वातंत्र्यासाठी सेवा

पॅरिसला सर्वधर्म परिषद झाली. १९०० मध्ये त्या सालच्या ऑक्टोबरमध्ये भगिनी निवेदिता अमेरिकेहून इंग्लंडला आली होती. सर्व-धर्म परिषदेहून जगदीशचंद्र बसू, त्यांच्या पत्नी सौ. अबला ही लंडनमध्ये निवेदिताकडे आले होते. जगदीशांची प्रकृती बरी नव्हती. त्यांचे एक छोटे ऑपरेशन झाले. सौ. अबला बसू आणि भगिनी निवेदिता यांनी त्यांची सेवा केली.

निवेदिता इंग्रजी वर्तमानपत्रांत लेख लिहीत. इंग्लंडमध्ये, स्कॉटलंड-मध्ये व्याख्याने देत. हिंदुधर्म व हिंदुस्थान यांच्या संबंधातच हे कार्यक्रम असत. मिळणारे पैसे बालिका विद्यालयासाठीच वाहात. हा सेवायोग चालू असताच हिंदुस्थान निवेदताची वाट पहात होता. निवेदिताने जून १९०१ मध्ये कु. मॅकलिऑड ( या रामकृष्ण मठात होत्या. ) यांना लिहिले, " आता ठरले ! उरले उपकारा पुरती ! हिंदुत्वाच्या राष्ट्रीय जागृतीची गरज मला स्पष्ट दिसते. जगन्माता चिंता करील, पण हिंदुस्थान स्वतंत्र झाला पाहिजे. जी संस्कृतिधारा खंडित झाली, ती पुन: प्रवाहित झाली पाहिजे. त्यासाठी मी त्वकरच हिंदुस्थानात येते."

## २१. " अखेर झाली आता, बाळा सोडूनि जाते माता "

निवेदिता ३ फेब्रुवारी १९०२ ला मद्रासेत आली. जनतेने उत्कृष्ट स्वागत केले. हिंदुपत्राचे जुने संपादक सुब्रह्मण्यम् अय्यर अध्यक्ष होते. निवेदिताला मानपत्र देण्यात आले. धर्मभगिनी, देशभगिनी म्हणून निवेदिताचा गौरव केला होता. भव्य समुदायासमोर निवेदिताने मान-पत्रास उत्तर दिले, " हिंदू स्त्रीचे समाजातील महत्त्व हा एक ठेवा आहे. तिचे शीलही ठेवाच आहे. जगाला देण्यासारखे आमच्या हिंदुस्थान

देशाजवळ पुष्कळ आहे. जीवनात बदल होत असतात. पण बदल स्वयं-प्रेरित हवेत. स्वपरिश्रमांनी साधलेले हवेत."

विवेकानंद काशीस होते. त्यांना हे सारे कळले. आनंद झाला त्यांना. निवेदिता कलकत्यास आली. विवेकानंदही आले. जून १९०२ पासून सरस्वतीची आराधना निवेदिताने सुरू केली होती. बालिका विद्यालयाची प्रगती सुरू झाली. पण विवेकानदांना आता ऐहिक जीवनातून मन काढावेसे वाटत होते. काढलेच होते जवळजवळ त्यांनी. तरीही २८ जून १९०२ ला बालिका विद्यालयात गुरुदेव आले. त्यांनी सर्व शिक्षकांस उपदेश केला की, "बालकांतील परमेश्वराची पूजा करण्यास विसरू नका."

एकादशीचा दिवस—२ जुलै १९०२. निवेदिताला बेलूरमठाकडे गेलेच पाहिजे असे वाटू लागले. जेवणे झाली. विवेकानंदांनी निवेदिताच्या हातावर पाणी घातले. ती म्हणाली, "हे काय? ही आपली सेवा मी करायची!"

गुरुदेव—"भगवन् येशूने नाही का आपल्या शिष्याचे पाय धरले?"

निवेदिता—"म्हणता काय आपण? ती कथा त्यांच्या आयुष्याच्या अखेरीची!!"

बोलणे तितक्यावरच राहिले. निवेदिता घरी परतली. तिच्या मनात सारखे येऊन राहिले की, "स्वामीजींची मी मानसकन्या, केवढे माझे भाग्य!" याच मनोराज्यात शुक्रवार वद्य चतुर्दशी उगवली. ध्याना-वस्थेत निवेदिताला वाटू लागले की, विवेकानंद आपल्यासमोर उभे आहेत. म्हणताहेत, "आता कैचे येणे जाणे। सहज खुंटले बोलणे॥" डोळे फाडफाडून त्यांचा माग घेण्याचा प्रयत्न केला तरी ते दिसत नाहीत. शिष्य मंडळींच्या कोंडाळ्यामुळे दिसत नसावेत म्हणून, मनाचे

समाधान ? छे ! इतक्यात वैराग्यमूर्ती, गुरूंचा गुरू भगवान शंकर दिसू लागले. दुसऱ्या दिवशी शनिवार ज्येष्ठ वद्य अमावास्या संवत् १८५८, ता. ५ जुलै १९०२. भल्या पहाटे कोणीतरी निवेदिताचे दार ठोठावले. निवेदिता दार उघडते, तोच तिच्या हाती चिठ्ठी पडली—

" प्रिय निवेदिता, पडदा पडला, काळ ओढवला ! काल रात्रौ नऊ वाजता स्वामीजी झोपले, ते पुन्हा न उठण्यासाठी. "—सदानंद.

निवेदिता तात्काळ बेलूरला गेली. अजून उजाडले नव्हते. स्वामीजींच्या खोलीत ती शिरली. स्वामीजी तिला ध्यानस्थ वाटले. तिने नमस्कार घातला. ती बोलली नाही, रडली नाही. तिने काही चौकशीही केली नाही. गुरुदेवांचे डोके मांडीवर घेऊन वारा घालीत बसली. दुपारपर्यंत दगडासारखी बसली. अंत्ययात्रा निघावयाची तेव्हा ती उठली. स्मशान-यात्रेस गेली. चितेपासून दूर एका झाडाखाली ती होती. मनोमन म्हणाली, " परमेश्वरा तुझी इच्छा ! " परत फिरताना म्हणाली, " महाराज, आपले कार्य उभे करणे हीच यापुढे आपली वंदना ! "

♠ ♠

## २२. अध्यात्माला राजकारणाची जोड

निवेदिताला स्वामी विवेकानंदांची आठवण सारखी येई. तिला त्यांचे शब्द सारखे आठवत की, " काही कल्पना नसलेल्या मार्गाने हिंदुस्थान स्वतंत्र होईल ! पण स्वातंत्र्याला पात्र असे स्वतःला आम्ही घडवू शकलो नाही, तर तीन पिढ्या तरी ते स्वातंत्र्य टिकेल काय ? हिंदुस्थानचा जपान करायचा नाही की रशियाही नाही. भारताच्या शासनात जातीजातींच्या मर्यादा पुसल्या गेल्या पाहिजेत, पण गुण अभंग राहिले पाहिजेत. सुसंघटित भारतात विद्वान, योद्धे, व्यापारी,

कष्टकरी यांना सारखीच प्रतिष्ठा मिळावी. त्यासाठी जनतेला शिक्षणसंपन्न केले पाहिजे. ”

त्याच कामाला निवेदिता लागली. रामकृष्ण मठाची ती आता राहिली नाही. रामकृष्ण-विवेकानंदांची ती शिष्या स्वतंत्रपणे कार्य करू लागली. त्यापूर्वी, विवेकानंदांच्या निर्वाणाच्या तेराव्या दिवशीच आपल्या जवळचा तो पुष्कळ कुणगा तिने रामकृष्ण मठाला देऊन टाकला होता. “ माझिया सांगाती वदा कोण येती ? ” या निवेदिताच्या साथीला स्वामी सदानंद व ब्रह्मचारी अमूल्य यांचीच साथ मिळाली. निवेदिता १९ जुलै १९०२ ला जेसोर येथे गेली. विवेकानंदांना श्रद्धांजली झाली. ती म्हणाली, “ विवेकानंद सर्वार्थाने व सत्यत्वाने थोर पुरुष होते. आपला धर्म, आपली देशबुद्धी, आपले सर्व काही त्यांच्यात पूर्णपणे प्रकट झाले होते की ! ”

मग भारताच्या दौऱ्यावर ती निघाली. मुंबई, नागपूर, बडोदा वगैरे शहरांतून ती सांगत सुटली की—“ लोकहो, हिंदुधर्माचे रत्न-भांडार आपल्याजवळ आहे. त्यातील तत्त्वाशी एकनिष्ठ राहा. त्यामुळे सर्व जगालाच लाभ होणार आहे. ”

निवेदिताची व्याख्याने लोकप्रिय झाली. बडोद्यास बाबू अरविंद घोषांची तिने गाठ घेतली. पार्नेलच्या आयर्लंडमधील एक मुलगी, स्वामी विवेकानंदांची मानसकन्या, हिंदू, निवेदिता भेटताच अरविंदांना आनंदच आनंद झाला. पुढे बंगालमध्ये “ अनुशीलन-समिती ” स्थापन झाली. ती क्रांतिकारक संस्था होती. तिच्या स्थापनेत निवेदिताचा फार मोठा वाटा होता.

बंगालच्या शहरांतून आणि खेड्यांतून लहान लहान गुप्त मंडळ्या होत्या. त्यांच्या संघटनेसाठी बॅ. प्रमथनाथ समिती निर्माण झाली. तीत निवेदिता होती. अवघ्या तीन वर्षांत क्रांतिकार्याचा सूर्य उदयाला आला.

क्रांतिकार्याचे शिक्षा गुरू अरविंद व विप्लवाच्या शिक्षा गुरू निवेदिता, अशी जोडी जमल्याने क्रांतिकारक विवेकानंदांचा आदर्श बंगाली लोकांपुढे उभा राहिला.

♠ ♠

## २३. लोकांची एकी व शहाणी शक्ती

मद्रास ! विवेकानंदांना गुरू म्हणून वंदन करणारे ते पहिले शहर. येथे २० डिसेंबर १९०२ रोजी निवेदिता " हिंदुस्थानचे ऐक्य " या विषयावर बोलत होती. तिने सांगितले—" हिंदुस्थानचे ऐक्य हा नुसता इतिहास नाही. हिंदुस्थानचे ऐक्य हे नुसते भविष्य नाही. हिंदुस्थान ही एक शक्तिपूर्ण व स्वत्वपूर्ण जीवनिका आहे. ब्रिटिशांनी हिंदुस्थानला ऐक्यभावना दिली हा भ्रम आहे. हिंदुस्थानात मूलभूत ऐक्य नसेल तर ते कोणीही देऊ शकणार नाही. हिंदुस्थानचे जीवित-कार्य स्वतंत्र आहे. धर्माची पुनः स्थापना होईल; हे राष्ट्र उभे राहील; जे सर्वसमावेशक आहे, जे निरंतर सामर्थ्यदायी आहे, अशा राष्ट्र-चैतन्याच्या आधारावर ! "

दौरा आटोपून परत आल्यावर निवेदिता देशसेवेला लागली. शेतकऱ्यांच्या झोपड्यांपर्यंत ती गेली. बारीक सारीक गोष्टींची चौकशी करू लागली. गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोरांनी विचारले, " इतक्या बारकाव्यात कशाला शिरायचे ? " निवेदिता, " स्वदेशाची प्रत्येक गोष्ट आत्मसात केल्याविना स्वदेशभक्ती कशी होणार ? "

समाजाचा असा अभ्यास करून निवेदिता देशसेवा करू लागली. बालिका विद्यालयाला जगदीशचंद्र बसू यांच्या भगिनी लावण्यप्रभा बसू यांची जोड तिने मिळविली. विद्यालयामध्ये भगिनी-निवास तयार होऊन चर्चा, विचार, पाठशाला, ग्रंथालय या तीन शाखा निर्माण झाल्या.

जन्माला आल्यासारखे काही करावयाचे आहे, अशा बाबींचे शिक्षण तेथे मिळू लागले, " मरावे परी कीर्तिरूपी उरावे । " एवढे तरी प्रत्येक विद्यार्थिनीला वाटू लागले.

हिंदूंच्या सर्व जमातींत ते विद्यालय आपलेसे झाले. निवेदिता त्या सर्वांची भगवती सरस्वती ठरली.

प्लेग १९०३ मध्ये कहर करून बसला. निवेदिता दार्जिलिंगला राहावयास गेली. या मुक्कामात नामदार गोपाळ कृष्ण गोखले तिच्या ओळखीचे झाले. गोडवा व सुजनता म्हणजे गोखले. निवेदिता म्हणजे भारतसेवा. दोघांत काँग्रेससंबंधी बोलणे निघाले. गोखल्यांनी विचारले, " आपण काँग्रेसपासून दूर का ? " " मी दूर नाही, पण नुसते ठराव करून काय होणार ? " निवेदिता उत्तरली. " काँग्रेसमध्ये शक्ती निर्माण झाली पाहिजे ना ? " गोखल्यांच्या अध्यक्षतेखाली बनारस काँग्रेस झाली. तिला निवेदिता हजर होती. " भारतीय ऐक्य काँग्रेसने जोपासावे, जनता शहाणी करावी. शहाण्या लोकमताचा पारतंत्र्याला कृतीने शह द्यावा; शेवटी भारतीय लोकशाही उज्ज्वलपणे विजयी व्हावी. असे आपले सर्व दिशांनी प्रयत्न हवेत. " बनारसमध्ये या विचारांचा उठावच निवेदिताने केला. शेवटी ती म्हणाली, " आमच्या शाळा, आमची घरे, आमच्या स्त्रिया व आमची मुले एकदिल, शहाणी व समर्थ झाली तरच भारतमातेचे पांग फिटतील.

## २४. राजकीय शिक्षिका निवेदिता

विवेकानंदांचा धाकटा भाऊ भूपेंद्र दत्त. " स्वदेशी " चळवळीच्या वेळी तो निवेदितेस मिळाला. त्याने एक दिवस निवेदितेला घरी आणले. क्रांतिकार्यात अग्रेसर असलेला भूपेंद्र, त्याच्याबरोबर त्याच्या घरी

निवेदिता ! मग इंग्रज सरकारचे हेर काय गप्प बसणार ? ते निवेदितेवर कडक नजर ठेवू लागले. तिच्या रहात्या घरावर तर पहाराच बसला !

लाल-बाल-पाल यांच्या न्यू इंडिया, मराठा अशा वृत्तपत्रांतच नव्हे तर इंग्लंडच्या ऑगस्ट मिनिस्टर रिव्ह्यु, अन् अमेरिकेचे बोस्टन हेराल्ड या वृत्तपत्रांतही निवेदिता लेख लिही. तिच्या लोकशिक्षणाचा व्याप हा एवढा होता ! या सगळ्या लेखांतून हिंदुस्थान स्वतंत्र होण्याची आवश्यकता हे सूत्र असे. अनुशीलन-समिती इंग्रजांच्या कचाट्यातून हिंदुस्थानला सोडविण्याकरताच स्थापन झाली होती. भूपेंद्र दत्त व बारींद्रकुमार अनुशीलन होते. ते निवेदिताला म्हणत, " तुम्ही आमच्या मार्गदर्शक जोन ऑफ आर्क ! आम्ही घालवतो का नाही इंग्रजांना ! पहा. " स्वदेशप्रेम आणि स्वार्थत्याग यांनी तरुण धगधगू लागले. निवेदिता त्या तरुणांना उपदेशी की, " गीतेमध्ये अमित शक्ती आहे. गीतेचा खरा अर्थ कळला तर एका हातात गीता अन् दुसऱ्या हातात खड्ग घेऊन क्षत्रिय वीर निघतील. त्यांची मान ध्येयप्राप्तीच्या विजयाने उंचावेल. पुरुष असा पाहिजे की, जो परिस्थितीला पायाखाली तुडवून ताठ उभा राहतो. मरणाला मारून टाका. भारत राष्ट्र हेच तुमचे दैवत करा ! "

अनुशीलन-समिती १९०४ साली चांगलीच संघटित झाली. तेथे राजकारणातील स्वातंत्र्यप्राप्तीचे अभ्यास जारीने सुरू झाले. अनुशीलन-समितीच्या तरुण क्रांतिकारकांत सखाराम गणेश देऊस्कर हा महाराष्ट्रीयन होता. त्यानें " स्वराज्य " ध्येयाचा उच्चार व प्रचार प्रचंड प्रमाणावर बंगालमध्ये केला. राजकीय जागृती १९०३ मधील दुष्काळात भरलेल्या दिल्ली दरबारचा निषेध करू लागली. शनिवार ता. ११ फेब्रुवारी १९०५ ला लॉर्ड कर्झन यांनी कलकत्ता युनिव्हर्सिटीत भाषण केले. त्यात भारताच्या प्राचीन चारित्र्यावर शिंतोडे होते. आधुनिक

आकांक्षांना हरताळ होता. निवेदिता ते कसे सहन करणार ? लगेच तिने " पौर्वात्य जगाचे प्रश्न " या पुस्तकातून कर्झनच्या खोटारडे-पणाचा पुरावा काढला. कलकत्ता हायकोर्ट जज्ज गुरुदास यांच्या हातात तो दिला. त्यांच्याकडून कर्झनला झणझणीत उत्तर लिहून घेतले अन् १३ फेब्रुवारीच्या अमृत बझार पत्रिकेत ते अग्रलेख म्हणून प्रसिद्ध करवले. " खोटा कोण ? " हा तो अग्रलेख ! ! अमृत बझार पत्रिकेचा तो अंक ॲटम बॉम्ब ठरला ! !

त्यानंतर स्वतंत्र हिंदुस्थानच्या राष्ट्रध्वजाचाच प्रचार निवेदिता करू लागली. ती सांगे, " स्वजनांना आशीर्वाद देणारा व शत्रूच्या छातीत धडकी भरवणारा असा ध्वज देशाला लागतो. पिढ्यांमागून पिढ्या येतात, नवनवीन रचना होतात, जातात, पण धर्म-देश यांचे अतूट दर्शविणारा ध्वज एकत्वाला व जरूर तर समर्पणाला आवाहन करीत असतो. हिंदुस्थानचा ध्वज वज्रचिन्हांकित हवा. सन्मान, पावित्र्य, शहाणपण, अधिकार आणि चेतना यांचा बोध दधीचींच्या अस्थिवज्रा-पासून होतो. वज्र फेकणारा हात आजिंक्य होतो. भारतीय ध्वजाचा रंग भगवाच हवा. त्याच्यावर वंदेमातरम् व " यतो धर्मस्ततो जयः ।। " अशी अक्षरे हवीत.

## २५. स्वदेशी क्रांतिसेवायोगाचा प्रचार

स्वदेशीच्या आंदोलनातून हिंदुस्थानच्या स्वावलंबनाचे, पौरुषाचे निनाद ऐकू येतात. हिंदुस्थानात थोड्याच दिवसांत असा काळ येईल की, देशी माल घेणारा मनुष्य गोहत्या करणाऱ्याइतका जनमनात निंद्य ठरेल.

ही निवेदितेची भविष्यवाणी ! ! कारण लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी ( १९०५ ) केली होती. व पोरेसोरे परदेशी खाऊही फेकून

देत होती. हा परिणाम अरविंद घोष व सुरेंद्रनाथ बानर्जी व निवेदिता यांनी केलेल्या चळवळीचा होता. शान्त तापसी आता उग्र सिंहवाहिनी झाली होती. निवेदिता स्वदेशीची चळवळ उघड करी आणि क्रांतिकाराचा उठाव ' उदंड करीं, परी गुप्तरूपें ।। "

बारिंद्र कुमारामार्फत खेड्यापाड्यांत स्वदेशी वस्तूंचा पुरवठा निवेदितेने केला. आणि स्वतः हातगाडी फिरवून रस्त्यारस्त्याने स्वदेशी वस्तू विकी. अगदी सामान्य माणसालासुद्धा जन्मभूमीची सेवा स्वदेशीने करता येते, असा प्रचारही निवेदिता करी. " भाई भाई एक ठाई ! भेद नाही, भेद नाही ।। " आणि वंदेमातरम्, वंदेमातरम् हे मंत्र निवेदिताने बोबड्या पोरापर्यंत रुजविले. ( १९०५ पासून १९२१ पर्यंत निवेदिताने बंगाल असा हलवला. )

१९०५ च्या कॉंग्रेसला निवेदिता गेली होती. तिच्या येथे कॉंग्रेसचे अध्यक्ष ना. गोखले व बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड चहाला आले. तेथे गोखल्यांच्या भारत-सेवा-समाजाची महती सर्वांना पटली. निवेदिता म्हणाली, ' खेड्यापाड्यापर्यंत सेवायोगाचे जाळे विणले पाहिजे.'

## २६. कर्मयोग व अखंड भारत

कर्मयोग नि अखंड भारत हे दोन शब्द म्हणजे विवेकानंदांनी दिलेला जीवन मंत्र ! निवेदिता तो जपे. लोकांस देई. शिवाजी हे त्या जपाचे ऐतिहासिक उदाहरण. त्याचा उत्सव करायचा असे बंगालमध्ये ठरले. निवेदिताने लोकमान्य टिळकांना उत्सवासाठी आणाविण्याची सूचना केली. कारण दहा वर्षांपूर्वीपासून ( १८९६ पासून ) लोकमान्यांनी ते वळण महाराष्ट्रात लावले होते. निवेदिताने रवीन्द्रनाथांना कविता करावयाला सांगितल्या. रविबाबू म्हणाले, " देशमातेची आज्ञा मी का मानणार नाही ? "

शिवोत्सव ४ जून १९०६ साली झाला. कलकत्याच्या टाऊन हॉलमध्ये प्रचंड सभा झाली. लोकमान्यांचे भाषण झाले, त्यांच्या मुक्कामात निवेदिताने एक स्वदेशी प्रदर्शन भरविले. निवेदिताच्या शाळेतील विद्यार्थिनींनी केलेल्या किती तरी वस्तू त्या प्रदर्शनात होत्या. लोकमान्य त्या पाहून खूष झाले. शिवाजी उत्सवाचे सभेत रवीन्द्रनाथ टागोरांनी गायलेले पद्य निवेदिताच्या विद्यार्थिनी गुणगुणताना पाहून लोकमान्यांची एकतानता झाली. ते गीत असे होते :—

**“ माराठीर साथे आणि हे बाँगाली ।**
**एककंठे बलो जयतु शिवाजी ॥**
**माराठीर साथे आणि हे बाँगाली ।**
**एकसंगे चला महोत्सवे साजी ॥ ”**

सखाराम गणेश देऊस्कर यांनी शिवाजीचे बंगाली चरित्र लिहिले होते, त्यातून बंगाली तरुणांनी देशदेसेवेची स्फूर्ती घेतली. हे निवेदितेने लोकमान्यांच्या नजरेस आणले.

लोकमान्य निवेदितेला म्हणाले, “ आपण स्वामी विवेकानंदांची मानसकन्या. आपण त्यांची परंपरा चालवीत आहात ! ! ” त्यावर निवेदिता उत्तरली. “ होय तर ! स्वदेशरूपी चालता-बोलता परमेश्वर सोडून तुम्ही आणखी कोणत्या परमेश्वराची पूजा करायला जाता, असा गुरुदेव प्रश्न करीत. मी तोच तरुणांना विचारते. देशाला देव मानण्यातच सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण आहे. अरविंदबाबूंना व ना. गोखल्यांनाही ते मान्य आहे. म्हणून मॅझिनी, गॅरीबाल्डी, काव्हूर यांचे कर्मयोग मी भारतीय तरुणांना समजावून देते. ग्रीस, फ्रान्स, रशिया येथील राज्यक्रांतीचे इतिहास सांगते. तसेच चाफेकर बंधूंचीही कथा सांगते. १९०३ मध्ये मी मुंबईला चाफेकरांच्या आईला भेटले होते. एकाहून एक तीन कर्तृत्ववान पुत्रांच्या हानीबद्दल त्या माऊलीचे

मी कसे सांत्वन करणार ? पण ती माऊलीच मला म्हणाली, " ऊं ! त्यात काय हो ? मरण का कुणाला चुकलेय ? आणखी दोन मुलगे असते तरी त्यांना मी देशासाठी मरा, असे सांगितले असते. त्या माऊलीचा हा बाणा पाहून मी त्यांच्या पायावर मस्तक ठेवले ! चाफेकर बंधूंचा हा पीळ बंगालमध्ये उतरला पाहिजे, असेच मी तरुणांना शिकविले असते. " वा ! वा ! हे कसे काय ? " लोकमान्य उद्‌गारले.

भगिनी निवेदिता म्हणाली, " रवीन्द्रबाबू टागोरनाही मी तेच सांगते. काय वाटेल ते करून अखंड भारताची एकजिनसी भावना वाढीला लावली पाहिजे. आणखीन देशातील कर्तव्यभाव जागृत करण्या-साठी क्रांतीचाही आश्रय केला पाहिजे. अर्जुनाला कृष्णाने—" क्लैब्यं मा स्म गमः पार्थ, नैतत्त्वय्युपपद्यते ! " असे सांगितले. त्याच्याही पलीकडे आपण गेलो आहोत. "

" अन् त्याचे परिणाम ? " एका तरुणाने तोंड खुपसले. निवेदिता ताडकन् उत्तरली, निर्भयचित्त होणे ही एकच गोष्ट आता साधली पाहिजे. हृदयातील रक्ताने देशातील कायरता, कापुरुषता धुऊन काढली पाहिजे."

## २७. भली उभारणी झाली

दुष्काळाने पूर्व बंगाल ग्रासला. १९०६ चा जुलै. आठवण झाली की, अजून शहारे येतात ! १९०५ सालचा तोटका पाऊस. कापणीच्या काळापर्यंत ( जानेवारी १९०६ पर्यंत ) लोकांनी कणगीतळचे धान्य अन् साठ्याचे पाणी यांच्यावर दिवस काढले, पण नवे पीक पशा-मुठींनीच आले. कसे दिवस वर्षाचे काढावे त्यावर ? रामकृष्णमठाचे संन्यासी तिकडे सेवेला गेले. ते आधाराला घांस-पाणी पुरवीत होते

प्रत्येकाला. पण त्यात देवाने आणखी एक टोला मारला. १९०६ चा ऑगस्ट दुष्काळातील तेरावा महिना ठरला. कारण? पूर्व बंगालला पावसाने झोडून काढले. हिमालयावरील बर्फ वितळून नद्यांना महापूर आले. गावेच्या गावे ओलीचिंब झाली. घराघरांतले मूठ-पसा धान्य अन् किडुक-मिडुक पावसाने नाहीसे केले.

निवेदितेचा जीव खाली-वर झाला. ती नावेत बसून खेड्याखेड्यांत हिंडली. लोकांची तिने विचारपूस केली, डोळे पुसले. स्वाभिमानी यातना होत होत्या तरी पश्चिम बंगालमधून निवेदिताने धान्य गोळा केले आणि ती आपली भिक्षा तिने घरोघर वाटली. सप्टेंबरमधील ही ओल्यातली सेवा निवेदिताच्या अंगावर आली. ती मलेरियाने आजारी झाली. कलकत्याच्या काँग्रेसला गेलेले ना. गोखले सवड सापडली की, निवेदितेच्या समाचाराला जात; तिच्या कपाळावर बर्फाची पिशवी ठेवून शुश्रूषा करीत. आजारीपणातही कलकत्याच्या काँग्रेसकडे निवेदितेचे लक्ष होते. जहाल-मवाळांच्या भांडणांनी काँग्रेस फुटू नये, असे तिला वाटे, " माझ्या गुरुदेवांचा आदर्श अखंड भारत होता. काँग्रेसच अखंड राहिली नाही तर भारत अखंड कसा रहाणार? " ही तिची चिंता होती.

दिवस आले अन् गेले. निवेदिताची प्रकृती सुधारत गेली. १९०७ चा जुलै उगवला. ४ तारखेस अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन व गुरुदेवांची पाचवी पुण्यतिथी. भूपेंद्रनाथ दत्तप्रभृती क्रांतिकारक शिष्यांना बरोबर घेऊन निवेदिता स्वामींच्या समाधीच्या दर्शनास गेली. सर्वांनी वन्दन केले. प्रदक्षिणा घातली. जनसंमर्दाच्या सभेत निवेदिता उद्घोषिली— "वही गुरुकी पुत्ते ! सद्गुरूंचा जयजयकार असो." जुलै ता. २४ सन १९०७ रोजी भूपेंद्रनाथ दत्ताला अटक झाली. त्याने 'युगांतर' पत्रात दोन लेख लिहिले होते. ते सरकारने राजद्रोही ठरविले होते. निवेदितेने

२० हजारांचा जामीन भरून भूपेंद्राला मोकळा केला ! ! कलकत्याच्या इंग्लिश मतपत्राने तिला ( इंग्लंड ) देशद्रोही ठरविले. युरोपियन समाज निवेदितेवर चवताळला. पण तिला त्यांचे काय ? ती आता सर्वस्वी हिंदकन्या होती ना ?

स्वातंत्र्य-संग्रामातील पहिली समिधा बंगालमध्ये भूपेंद्राची पडली. त्याला एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा झाली. भूपेंद्र विवेकानंदांचा भाऊ होता. धीरोदात्त राहिला. निवेदिताला आनंदाचे व आश्चर्याचे उधाण आले.

देवी भुवनेश्वरीला तिने बातमी दिली. म्हणाली, " देशाला तुम्ही दोन रत्ने दिलीत. " आपल्या मनाशी ती व भुवनेश्वरीही म्हणत होत्या, " नाही पुरी उलटली; जरी पाच वर्षे, तो कार्यसिद्धी इतुकी मन का न हर्षे ॥ "

♠ ♠

## २८. जोमदार धर्म म्हणजे देशभक्ती !

कलकत्याच्या टाऊन हॉलमध्ये सन १९०६ साली सिस्टर निवेदिता व्याख्यान देत होती. विषय होता, " जोमदार धर्म. " सभेच्या रंग-मंचावर युरोपियनांची झुंबड बसली होती; सभागृहाच्या प्रेक्षागारात बंगाली तरुण चिक्कार होते. जिवाचा कान करून ते निवेदिताचे व्याख्यान ऐकत होते. वारे भरल्यासारखी निवेदिता बोलत होती. तिचा जोमदार धर्म म्हणजे देशभक्तीचा राष्ट्रधर्म, हे चटकन लोकांना कळले. राजद्रोहाच्या आरोपाखाली निवेदिताला हिंदुस्थानातून हद्दपार केली पाहिजे, असे युरोपियन चरफडून चरफडून बोलू लागले; पण निवेदिताचे दीड तास व्याख्यान झाले. त्याने सभा चित्रासारखी बसली होती ! ती सुस्वराने उठाव देत होती—" बसता काय ? उठा; सोडवा भारत-

मातेला पारतंत्र्यातून ! मी शहाणा का तो मूर्ख, हा पुरे झाला शब्दच्छळ ! ! कृती—सेवारती यांनी स्वातंत्र्याकडे प्रगती करा. उठा. उठा, उठा ! ! ”

## २९. सेवा तुझीच नजरेत सदैव देशा

ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध हिंदुस्थानने केले. त्याने १८५७ नंतर १९०७ व १९०८ या सालांना महत्त्व आले :—

**“ स्वतंत्रताका मूल्य प्राण है ।**
**देखे कौन चुकाता है ॥ ”**

असा ध्वनीच प्रत्येक तरुण अंतःकरणांत घुमत होता. अशा स्थितीत निवेदितेवर ब्रिटिश सरकारची कडक नजर ! ! ! तेव्हा १९०७ च्या ऑगस्टमध्ये निवेदितेने हिंदुस्थान सोडले. अन् इंग्लंड गाठले. सप्टेंबर मध्ये तिला बातमी आली की,—

संध्या पत्राचे संपादक ब्रह्मबांधव उपाध्ये यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. त्यांनी न्यायमूर्तींस साफ सांगितले की, “ कोण तुम्ही अन् तुमचे सरकार ? ” बोलून चालून परके. परक्यांनी भरलेल्या खटल्यांत मी भाग घेणार नाही ! ईश्वरी कार्यातला मी पाईक आहे. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हे ईश्वरी कार्य आहे. तुम्ही मला शिक्षाच कशी करू शकता ? ” आणि उपाध्याय बाबूंचे शब्द खरे ठरले. खटल्याचा शेवट व्हायच्या आतच त्यांचा शेवट झाला.

ही बातमी ऐकून निवेदितेला रडे कोसळले. का ? तिने विवेकानंदांच्या चितेपाशी स्वदेशसेवेची शपथ घेतली होती, तशीच उपाध्यायबाबूंनी घेतली होती ! तो आपला एकुलता एक भाऊ गेला, असे तिला

झाले. ती उद्गारली, " वहीं गुरुकी फत्ते ! " नोव्हेंबर १९०७ पासून निवेदिता युरोप हिंडली. रशियन क्रांतिकारक प्रिन्स कोपाट्किन १९०८ मध्ये लंडनला आला होता. तेथे त्याच्याशी गुफ्तगूं झाले ! निष्कर्ष एवढाच निघाला की, " कोणत्याही परिस्थितीत स्वातंत्र्य लांबणीवर पडू शकत नाही. "

या काळात इंग्लंडमध्ये निवेदिता रामायण, महाभारत, विवेकानंद या विषयांवर भाषणे देत होती. पार्लमेंटच्या सभासदांच्या गाठी घेत होती. तिचा शिष्य हेमचंद्रदास ( सेनापती ) बापटांबरोबर पॅरिसमध्ये बॉम्बची विद्या शिकला, हेही तिने पाहिले होते. मेहचंद्राच्याच कलकत्यातील खटपटीतून मे १९०८ ची माणिकतोळा बॉम्बकेस झाली. बंगालमधील घटनांवर केसरीतील लेख आले व लोकमान्यांना जुलै १९०८ मध्ये सहा वर्षे काळे पाणी झाले. हे व असेच पौरुषाचे साक्षात्कार भारतात झालेले पाहून निवेदिता आनंदली. ऑक्टोबर १९०८ मध्ये निवेदिता अमेरिकेत गेली. एक वर्षाची सजा भोगून सुटलेला भूपेंद्र दत्त हाही आता अमेरिकेस आला होता. तेथे त्याच्या शिक्षणाची सोय अन् बालिका विद्यालयाला मदत, निवेदिताने मिळविली.

जानेवारी १९०९ मध्ये निवेदिता लंडनला आली. तिची जन्मदात्री इसाबेल नोबल आजारी होती; तिची सेवा तिने केली. पण २६ जानेवारी रोजी इसाबेल ख्रिस्तवासी झाल्या. मग घरची व्यवस्था लावून निवेदिता युरोपात हिंडली. पण १ जुलैला मदनलाल धिंग्राने भारत–मंत्र्याचे राजकीय सचिव सर कर्झन वायली यांना गोळी घातली. हे तिने ऐकले आणि मग तिला राहवेना. आपल्या सांगीवरून ज्यांनी सर्वस्वाचे बलिदान केले, त्यांचा समाचार घेणे कर्तव्य आहे, असे तिला वाटले. १६ जुलै १९०९ ला मुंबई व १८ जुलैला कलकत्यास दाखल झाली.

लगेच बोसपारा आळीत व बालिका विद्यालयात तिचा सेवायोग सुरू झाला.

♠ ♠

## ३०. अनुकूल काळ

मोर्लेमिंटो सुधारणा आल्या. कोणाला रस होता त्यात ? क्रांतिकारक अंदमानात खितपत होते, जहाल देशोधडीला लागले होते आणि मवाळ मल्लूलपणे चालले होते. अरविंदबाबू पाँडिचरीला आपण होऊन परागंदा झाल्यावर त्यांच्या कर्मयोगी पत्राची जबाबदारी निवेदितेने १२ फेब्रुवारी १९१० रोजी अंगावर घेतली. लगेच २ मार्चला एक इंग्लिश स्त्री निवेदिताचे बालिका विद्यालय पहावयास आली. बरोबर एक अमेरिकन मैत्रीण व एक इंग्लिश मित्र होता. निवेदितेने अगत्याने विद्यालय दाखवले. हसत खेळत सर्व कार्यक्रम झाला. परत जाताना ती म्हणाली, " मी लेडी मिंटो. " म्हणजे ? " निवेदिताने पृच्छा केली. " व्हॉईसरॉयच्या पत्नी ? " " तर काय ! " मग निवेदिताने लेडी मिंटोला दक्षिणेश्वर व बेलूर मठही दाखविला. निवेदिता ही साध्वी असल्याची लेडी मिंटो यांची खात्री होऊन चुकली. त्यामुळे सरकारी गैरमर्जी गेली.

एप्रिलच्या १० चा कर्मयोगी काढला व पाँडिचरीत अरविंद असल्याचे जाहीर करून तो बंद केला. जूनमध्ये मग निवेदिता केदारेश्वराच्या यात्रेला गेली. बरोबर जगदीशचंद्र बसू व सौ. अबला बसू होते. निवेदिताच्या क्रांतिकार्यापासून शांतिधर्मापर्यंत सर्व काही बसू दांपत्याच्या " दे दान, गुप्त उपकार करी, न बोले ॥ " या सहकारावर चालायचे.

निवेदिता जुलैत यात्रेहून परतली. ऑक्टोबरमध्ये मिसेस् ओल्बुल यांचे अमेरिकेहून बोलावणे आले. निवेदिता गेली. ओल्बुलनी तिला

बालिका विद्यालयासाठी दोन हजार पौंड आणि जगदीशचंद्रांच्या बसू विज्ञान मंदिरासाठी तीन हजार पौंड दिले. " आई, थोर तुझे उपकार। " निवेदिता म्हणाली. थोड्याच काळात ओल्बुल यांनी जगाचा निरोप घेतला.

## ३१. दिवस असे गेले

इंग्रजांच्या दडपशाहीने सगळ्या हिंदुस्थानात अवकळा पसरली होती. ज्यांच्या जिवावर चैतन्यमय कर्मयोग करावा, ते समाजाबाहेर होते. कोणी बंदीशाळेत. कोणी निर्वासित. कोणी भूमिगत ! शनि-माहात्म्यात विक्रमराजाचे हातपाय तुटले व तो तेल्याच्या घाण्याचा बैल हाकत बसला, अशी कथा आहे. निवेदिताचे आता तसेच झाले ! दिवस उगवे आणि मावळे. ठराविक कामे तीही करी. पण त्या जीवनात राम नव्हता ! !

खिडक्या, दारे लावून घेऊन निवेदिता ईश्वरचिंतन करू लागली. काही ईश्वरी आदेश मिळतोय का, हे ती पाहत होती. मनाच्या एकाग्र स्थितीत भगवान् शंकराचे दर्शन तिला केव्हा केव्हा होई; केव्हा केव्हा जगन्माताही प्रगटे. पण आदेश नाही. जनतेशी संपर्क नाही, असे दिवस चालले. १९११ जून उगवला. निवेदिता मायावती तेथे रहावयास गेली. एक महिन्याने तिकडून ती परत आली. तिला कळले की, भुवने-श्वरीदेवी आजारी आहेत. आपल्या गुरुदेवांची माऊली ती ! तिची काळजी मी वाहीन, असे निवेदितेने भूपेंद्राला वचन दिले होते, या वेळी भूपेंद्र तुरुंगात नव्हता, अमेरिकेत होता; " गदर " चळवळीचे जाळे विणावयास सुरुवात झाली होती. इंग्रजांच्या हाताखालील हिंदी सैन्य देशभक्त करावयाचे व त्यांच्याकडूनच इंग्रजाला हिंदुस्थानातून हुसका-

वयाचे, अशी पंजाबी मंडळींनी उभारलेली ती ' गदर ' चळवळ ! तीत भूपेंद्र गुंतलेला. तेव्हा तो कसला आईच्या सेवेला येणार ? म्हणून निवेदिता आपले वचन सार्थ करू लागली.

भुवनेश्वरीदेवीची सेवाशुश्रूषा निवेदिताने केली. जीवेभावे केली; रात्रीचा दिवस करून केली. पण, " आले देवाजीच्या मना । तेथे कोणाचे चालेना ॥ " २५ जुलै १९११ रोजी गुरुमाता भुवनेश्वरीदेवी अनंतात विलीन झाल्या.

भूपेंद्राला सर्व हकीगत कळवून निवेदिताने त्याला सांत्वनपर पत्र लिहिले. त्या पत्राने भूपेंद्राला आई गेल्याचे दु:ख दाटले. पण तितक्याच प्रेमाची ताई असल्याची खात्री पटली.

पुन्हा दिवस जाऊ लागले. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये स्वामी रामकृष्णानंद, श्रीमती सुधीरा बसू अशा जिव्हाळ्याच्या सहकाऱ्यांनी इहलोकाचा निरोप घेतला. मग तर निवेदिताला एकलकोंडेच वाटू लागले. प्रकृतीही बिघडू लागली. जीवन आणि जगत् यांच्याबद्दल निवेदिताला अनासक्तीच वाटू लागली. आणि ? दृश्य पसाऱ्यापलीकडच्या ईश्वरीशक्तीकडे ती अधिकाधिक ओढ घेऊ लागली. १९११ चा दसरा जवळ आला होता. निवेदिताला वाटू लागले—लोक, झालेल्या चिमूटभर कामाचा डोंगर करून वाखाणतात. मोठे मन आहे त्यांचे ! पण डोंगरभर काम उरले आहे, त्याला माझे चिमूटभर आयुष्य कसे पुरणार ?

तरीही प्रकृतीसाठी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात निवेदिता दार्जिलिंगला गेली. दोन-तीन दिवसांच्या मुक्कामावर असलेल्या हिमाल्याच्या शिखरांच्या दर्शनास घोडेदौड करण्याचा बेत झाला. सिक्कीममधील ती शिखरे पाहायची होती. पण निवेदिताला रक्ती आव झाली आणि केलेला बेत जिथल्या तिथे जिरला.

डॉ. नीलरत्न सरकारांनी निवेदिताला तपासले. पण डॉक्टरांचा गंभीर चेहरा काही वेगळेच सुचवू लागला ! !

♠ ♠

## ३२. अनंतात विलीन ! !

दार्जिलिंगला निवेदिता कमालीची आजारी पडली. देवाची इच्छा मानलीच पाहिजे. म्हणून ती कान टवकारी, तेव्हा दक्षिण दिशेकडून अज्ञात संगीत तिच्या कानांवर पडे. त्या वेळी तिचा देह, मन, बुद्धी आनंदाने पुलकित होत.

तिच्या खोलीत गंभीर, उदात्त, पवित्र वातावरण भरलेले होते. जगदीशचंद्र बसू व सौ. अबला बसू या दोघांनाही एकच ध्यास होता, भगिनी निवेदितेची प्रकृती !

निवेदिताच्या नजरेत, वाणीत आणि संकेतात एक गोडवा आला होता. मरणाचे तिला काहीच वाटत नव्हते. जुना, जीर्ण कपडा बदलण्यापलीकडे त्यात काय ? तिचे चव्वेचाळीसवे वर्ष संपत आले होते. " मरणांत खरोखर जग जगते । " हे तिच्या प्रत्ययास येत होते. " असतो मा सद्गमय । " ही तिची प्रार्थना सवड सांपडली की चालू असे.

शरीर थकत गेले, तशी निवेदितेची अनंताशी निष्ठा अधिकाधिक प्रज्वलित झाली. तशात १३ ऑक्टोबर १९११ शुक्रवार उजाडला. आज दार्जिलिंगचे आकाश निरभ्र होते. हृदयाशी रुद्राक्षमाळा धरून निवेदिता जप करीत होती. जवळच सौ. अबला बसू उभ्या होत्या. निवेदिता त्यांना म्हणाली, " नौका बुडू घातली आहे; पण अजूनसुद्धा सूर्योदय झालेला मी पाहीन. "

सकाळी सात वाजले. सूर्यकिरणांनी खिडकीवाटे निवेदिताच्या अंतःकरणापर्यंत प्रवेश केला. त्या किरणांवर तरंगत जाऊन निवेदिताचे चैतन्य अनंतात विलीन आले ! ! मुकाट पडलेल्या देहावर, विशेषतः चेहऱ्यावर, पावित्र्याची, भक्तीची, समाधानाची आणि अभयाची मनोहारी प्रभा पसरलेली होती ! !

हजारो लोकांनी दुपारी २ वाजता निवेदिताचा देह सन्मानपूर्वक गंगाकिनारी नेला आणि हिंदू, युरोपियन सगळ्यांनी "हरि बोलो हरि" म्हटले. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे, निवेदितेच्या जीवनयज्ञाला साजेसा, तिच्या देहाचाही यज्ञ झाला ! !

♠ ♠

## ३३. निवेदितेचे स्मारक

निवेदिता गेली. तिचे दहन झाले, त्या जागेवर तिची समाधी झाली. "आपले सारसर्वस्व हिंदुस्थानसाठी अर्पण केले, त्या पुण्यभगिनी निवेदिता." असा स्मृतिलेख तेथे आहे.

कलकत्यात तिने चालविलेल्या बालिका विद्यालयालाही निवेदिता विद्यालय म्हणतात. कार्याबद्दल तीव्र निष्ठा, कार्याच्या यशाचे वेड, व्यक्तिगत मानापमानादी भावनांना ध्येयसिद्धीसाठी दूर ठेवण्याची तत्परता, देशजागरासाठी अनेकविध सेवा, वैदिक संस्कृतीचे व्यवहार-शुद्ध आचरण, अभय, सत्वसंशुद्धी, ज्ञानयोग, व्यवस्थिती आणि यज्ञ या गुणांची घरोघर जोपासना होण्यातच निवेदितेचे खरे स्मारक नाही काय ? निवेदितेच्या जन्मशताब्दीच्या व स्मरणछप्पन्नीच्या वर्षात ( १९६७ ), स्थितप्रज्ञ वृत्तीची तरुण मंडळी देशसेवेसाठी पुढे येऊन भारताला सर्वसमर्थ आणि अजिंक्यपणे जगाचा नेता करण्याची प्रतिज्ञा घेतली तर त्याच्याइतकी रामकृष्ण-विवेकानंद-निवेदिता परंपरेची दुसरी कृतज्ञ पूजा कोणतीही नाही.

♠ ♠ ♠

# भगिनी निवेदितांचे कानमंत्र

( १ ) लोकांच्या रोजच्या जीवनात व रोजच्या कामकाजात, रोजच्या व्यवहारात उपयोगी पडेल असे शास्त्रीय ज्ञान, आरोग्यज्ञान, सहकर्म-ज्ञान, संघटनाज्ञान या ( विश्व ) मंदिरातील व्यासपीठावरून दिले गेले पाहिजे.

( २ ) समाजसेवेचे जे कर्म आपणास करता येणे शक्य असेल— मग ते शेती, विणकाम, कुंभारकाम, मृत ढोरे फाडण्याचे काम, कोणतेही असो ते नीट हृदय ओतून करावे व मुक्त व्हावे.

( ३ ) पंथ म्हणजे श्रद्धावान जीवांचा संघ.

( ४ ) एकमेकांना मिळालेले सत्याचे किरण जर एकमेक आदराने घेतील तर सर्वांच्या मार्गातील अंधार दूर होऊन पाऊल टाकण्यापुरता प्रकाश मिळेल. अखेरचा सर्वसंग्राहक विशाल पंथ म्हणजे मानवजात.

( ५ ) धर्म जिवाशिवांचे ऐक्य करतो, त्याचप्रमाणे सर्व मानव-जातीचेही ऐक्य करतो.

( ६ ) आपल्याला रिकामा मिळालेला वेळ आपण कशात खर्च करतो, यावरून आपल्या शिक्षणाची खरी परीक्षा होत असते.

( ७ ) अंगबळापेक्षा अकलेचे बळ अधिक; परंतु अकलेच्या बळा-पेक्षा चारित्र्याचे बळ अधिक.

( ८ ) जेथे काही तरी मिळवावे ते मिळवण्यासाठी मरावे असे वाटत नाही, ते जीवन कसचे ?

( ९ ) नम्रपणा हा ज्ञानाचा आरंभ आहे. ज्याच्याजवळ आपण काही शिकतो त्याला आपण पूज्य मानले पाहिजे.

( १० ) जो सद्गुरू असतो, तो काही एक मागत नाही.

( ११ ) आपल्या रक्ताने कर्म रंगवा म्हणजे श्रीरंग तुम्हांला भेटेल.

( १२ ) या सृष्टींत अपार विविधता आहे. जिकडे जाल तिकडे अनंताचे दर्शन घडेल.

( १३ ) आजचे उत्कृष्ट सैनिकच उद्याचे सेनानी होतील.

( १४ ) पचविलेल्या अनुभवांचे फळ म्हणजे आपले चारित्र्य होय.

( १५ ) कमीत कमी तीन हजार वर्षांचे थर उकरून भारताचा इतिहास लिहिला गेला पाहिजे.

( १६ ) प्रत्येक प्रांतिक भाषेत थोर व महनीय साहित्य निर्माण झाले पाहिजे.

( १७ ) मारुतीच्या हृदयात श्रीराम होता त्याप्रमाणे आपल्या हृदयात रामकृष्णांची जननी जी भारतमाता ती असू दे.

( १८ ) सर्व आचार व विचार यांच्या ज्या पद्धती आहेत त्यांच्या मुळाशी शीलसंवर्धन हाच हेतू असतो.

( १९ ) भूतकाळाचे पंख वापरून भविष्यकाळची पाऊल—उचल-होऊ द्या.

( २० ) शिकवावयाच्या विषयातील “ उत्कट भव्य तितुके ” ज्याच्या लक्षात आले तोच शिक्षक आपली छाप पाडील.

( २१ ) मुलांना घरी ज्या ध्येय-धोरणांचे वळण लावण्यात येते त्यांचा पाठपुरावा आत्यंतिक नीतिनियमांनी करणे ही शाळांची महत्त्वाकांक्षा हवी; त्याचप्रमाणे शाळाशाळांतून ज्या ध्येयधोरणांचे वळण लावण्यात येते त्यांचा घराघरांतून पाठपुरावा झाला पाहिजे, शाळा व

घर यांचा असा परस्पर सहकार होणे हाच शिक्षणाचा समर्थ दण्डक आहे.

( २२ ) राष्ट्राचा विचार करताना त्याचा इतिहास, त्याचा भूगोल आणि त्याचे इतर राष्ट्रांशी संबंध लक्षात तर घ्यावे लागतातच, पण इतरांच्या मानाने आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठाही पारखावी लागते.

( २३ ) माणूस माणसामाणसापासून माणुसकी शिकत असतो.

( २४ ) अध्यात्मदृष्टीने मनुष्य हे परमेश्वराचे लेकरू आहे. पण व्यावहारिक दृष्टीने माणूस हा पृथ्वीचे संगोपित पोर आहे.

( २५ ) व्यक्तिव्यक्तीप्रमाणेच राष्ट्रही आत्माविष्कार करीत असते.

( २६ ) संघटना, समन्वय आणि सहकार हा चालू युगधर्म आहे.

( २७ ) हिंदुस्थान हीच आमची मातृभूमी आणि तिच्या पाठीवरील प्रत्येकजण सर्वप्रथम—भारतीय आहे, या भावना प्रत्येकाच्या रोमरोमात शहारून सोडल्या पाहिजेत.

( २८ ) छाटीने संन्याशी होत नाही; सर्वस्वसमर्पणाने संन्याशी होतो. सर्वस्वसमर्पणाचे सातत्य हा सन्याशाचा पाठकणा आहे.

( २९ ) अनन्यभावाने काम हाती घेतले की प्रयत्न-परमेश्वर प्रसाद देतोच देतो.

( ३० ) अन्याय होताना दिसतो आहे ना ? मग मला तो जुलूम झुगारलाच पाहिजे. ही मनाची उचल झाली की कर्म याचा अर्थ ल्लाटरेषा रहातच नाही. कर्म याचा अर्थ सत्कार्याची संधी, पुण्याईची तीर्थयात्रा असाच होतो.

( ३१ ) जीवनातील उत्कट—भव्य असेल तेवढे जरूर लागल्यास उसासारखे आपल्याच गुडघ्यावर मोडून लोकांची तहान भागविण्याची तयारी, म्हणजेच खरी रग.

( ३२ ) कर्मयोगाची उचल घेऊन वाटचाल होऊ लागली की सिद्धान्त, परिपाठ, परंपरा चट साऱ्या बाजूला सरतात. एका ध्येया-शिवाय " भीति कशाची ? पर्वा रे कशाची ? " अशी बेभान वृत्ती होते. हौसेला तसेच ध्येयनिष्ठेला मोल नसते. भारताचा महाभारत करण्याच्या ध्येयाला आपण वाहून घेतले तर भूतकाळापेक्षाही मोठाले यज्ञ आपल्याला भविष्यकाळासाठी करावे लागतील. " सर्व यज्ञे प्रतिष्ठितम् " ।

( ३३ ) हिंदुस्थानची प्रतिष्ठा जागतिक जमान्यात अमर करणे हे जसे एक आपले अपरिहार्य कर्तव्य आहे, तसेच जगाच्या ज्ञानात भर घालून त्याला सहजीवनाचा धडा देणे हेही आपले एक कर्तव्य आहे. " हे विश्वाचि माझे घर " ! अशी आपली भारतीय संस्कृती आहे.

( ३४ ) हिंदुस्थानला हवे आहेत कलावन्त; असे की ते कल्पना-विहंगावरून आकाशात संचार करणारे कवीही असावेत, पण त्याच-बरोबर व्यवहाराच्या जमिनीवर आखणीमापणीने आराखडे काढणारे चित्रकारही हवेत.

( ३५ ) " पाहे इतिहासाच्या मूर्ति " ते " सांगे वडिलांची कीर्ति " त्यांनाच साजेशी नव्या काळी कृती करून ! भूतकाळाच्या अभ्यासाने भविष्याच्या घडणीला प्रेरणा दिली तरच राष्ट्राचा जितेपणा आणि जेतेपणा जगन्मान्य होतो.

( ३६ ) अहो, आपल्याला साहित्यनिर्मितीही करावयाची आहे ना ? मग करा की हिंदुस्थानच्या अठरापगड भाषांतून ! पण साहित्य-निर्मिती म्हणजे लुसलुशीत शब्दांची खुसखुशीत कोशिंबीर नव्हे हं ! अहो, तसली कोशिंबीर म्हणजे साहित्याच्या ताटातील एक तोंडी-लावणं ! त्याला जागेची व चवीची मर्यादा आहे. साहित्याचा खरा

नैवेद्य सरस्वतीला—भगवतीला सादर करावयाचा असेल, तर त्याने भूतकाळाची प्रेरणा सुगंधित केली पाहिजे, वर्तमानकाळाच्या अपेक्षांचा अर्थ चवदार केला पाहिजे. आणि भविष्याचे अंदाज रसरशीतपणे पचनक्षम केले पाहिजेत; आणि हे सर्व विज्ञानाच्या नीटनेटकेपणाने प्रमाणशीर सांभाळून हं ! !

( ३७ ) हिंदुस्थानला आपला नवा इतिहास चैतन्यमय कृतींचा करावयाचा आहे. मागचा इतिहास सुद्धा हजारो वर्षांचा मानवसुलभतेने, भावनोत्थानाने आणि हिंदुस्थानातील जनतेच्या स्वभावविशेषांच्या शुद्ध आविष्काराने परिपूर्ण करून तरुणांच्या पुढे मांडावयाचा आहे.

( ३८ ) अर्वाचीन जीवनमूल्यांनी प्राचीन ज्ञानाचा तोल आपणांस सांभाळावयाचा आहे. जुने सामर्थ्य नव्या दमाने उभे करावयाचे आहे.

( ३९ ) जीवन हा एक झगडा आहे असे म्हणतात. मग त्यात मारावयाच्या कुस्त्यांनी आपण जागतिक संस्कृतीत मोलाची भर घातली पाहिजे. भारताचे भारतीयत्व सर्वत्र चमकवूनच ते साधणारे आहे. राजकारण, समाजकारण, शिक्षण, संगोपन, औद्योगीकरण या सर्वांत भारताचे वैशिष्ट्य सकसपणे उतरविण्याची जबाबदारी भारतीय तरुणांनीच घेणे जरूर आहे.

( ४० ) माणसाचे शील त्याच्या संकलित अनुभवातून विकासलेल्या बुद्धीच्या धारणेला आलेले फळ होय.

( ४१ ) अपयशाची चिकित्सापूर्वक मीमांसा हाच त्या अपयशाला साफ धुवून काढण्याचा शुद्ध मार्ग. मायेमधून न्याहाळून पाहिले की माया संपते, अशी भारतीयांत म्हण आहे, तिचा खरा अर्थ तो !

( ४२ ) उच्चतम अध्यात्माची गुरुकिल्ली म्हणजे विवेकशुद्ध विवंचना.

( ४३ ) स्वतःला मुक्ती मिळवण्यापेक्षा दुसऱ्याचे संरक्षण करणे लाखोपटींनी पुण्यप्रद.

( ४४ ) शील हे अध्यात्मवृत्तीचे निशाण आहे.

( ४५ ) भारतात असा आढळ होतो की, समाजाचे व्यक्तीवर जन्मभर लक्ष असते आणि व्यक्तीच्या खाण्या–पिण्यापासून सर्व लहान-मोठ्या हाल्चालींवर तात्पुरती का होईना, टीका करावयास समाज भीत नाही. म्हणून सार्वजनिक कार्यकर्त्यांचे शील संशयातीत असलेच पाहिजे.

( ४६ ) राष्ट्रीयता हे क्षणोक्षणीच्या जीवनाचे रसनिर्झर व्हावयास, देशाचा इतिहास नवीन पिढीपुढे सारखा खेळवत ठेवला पाहिजे. रामलीला, मोहरम–मधील खेळ जन्माष्टमीच्या क्रीडा, वीरस्तोमी वा दसऱ्याच्या स्वाऱ्या यांच्याइतक्या जिव्हाळ्याने वेदोपनिषदांच्या यज्ञीय ज्ञानसत्रापासून, चंद्रगुप्त प्रभृतींच्या परदेशसंपर्कामधून, रामायण–महाभारताच्या शिकवणीने धर्मासाठी फकिरी घेणाऱ्या शिवाजी–बाजीरावांच्या कल्याणकारी हाल्चालीपर्यंत सगळ्या इतिहासाचे प्रबोधन भारताच्या नवनवोन्मेषशालिनी पिढीपिढीवर ठसविले पाहिजे.

( ४७ ) आपण सर्व कर्मयोगी भावंडे आहोत, ती केवळ आपली बोलभाषा एक आहे किंवा उपासनेचा संप्रदाय एकच आहे म्हणून नव्हे ! माझ्याच आईचा एक मुलगा दूर देशी गेला, अन्यभाषा पारंगत झाला आणि पार्थसारथीच्या ऐवजी महादेवाची भक्ती करू लागला, म्हणून काय तो माझा भाऊ नव्हे काय ? भाषा, संप्रदाय व भौगोलिक मर्यादांनी आमच्या बंधुत्वाचा संकोच होतच नाही मुळी ! आम्ही कर्मयोगी बांधव आहोत. याचे कारण आम्ही एकाच भारत-मातेची लेकरे आहोत आणि तिच्या इतिहासाच्या परंपरांचे दूधच

आमचे पोषण करीत आले आहे. तिच्याच मनोवृत्तीचा पीळ आमच्या मनावर संस्कार करून बसला आहे. म्हणून भारतीय वीर-वृत्तीचे उत्थान हे आमच्या पुढे असलेले कार्य आहे. आपल्या शिराशिरां-तील बळ एकवटून त्यासाठीच आपल्याला कर्मयोग करावयाचा आहे. राजकीय वा अन्य क्षेत्री थोडेसे कोठे मतभेद झाल्याबरोबर आम्ही दोन बाजूला सरकून एकमेकांच्या झिंज्या उपटून ऐनजिनसी आमचे बंधुत्व बळी देऊ, हे सांगितले कोणी तुम्हांला ? नादान ! ! आम्ही मूळचेच एक आहोत. आम्हांला एकी करीत बसावयाचे नाही ! " काव्हलो, कातावलो, आवाज केला तरी भांड्याला भांडे लागण्याइतकाच ! कोणी कोणाला पोचा नाही येऊ देणार ! धर्मराजांनी सांगितले तसा प्रसंग आलाच तर जगाला " वय पंचाधिकं शतम् ! " हेच दृश्य दिसेल.

( ४८ ) बागेत निरनिराळ्या पसाऱ्याचे ताटवे असतात, लहान-मोठ्या उंचीची झाडे असतात, निरनिराळ्या वळणांच्या वेली असतात, त्यांना पाने-फुले निरनिराळ्या रंगांची व सुगंधाची येतात. म्हणून का ती बाग स्वतःवरच उठली आणि स्वतःचे तुकडे करून बसली, असे म्हणावयाचे ? भारताचेही तसेच आहे. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांत, भाषांत, रीतिरिवाजांत आणि त्यांच्या पाठी-मागील प्रेरणांत ऐतिहासिक संस्कृतीचे एकजिनसी सामर्थ्य आहे. त्याची पक्की ओळख आपण करून घेतली पाहिजे व पुढील पिढ्यांना देत राहिले पाहिजे. भात शिजत असता तपेल्यावरील झाकणाला नाचायला लावणाऱ्या वाफेला जी शक्ती होती ती माणसाने ओळखल्या-बरोबर तो तिच्या जोरावर आगगाड्या, जहाजे चालवू लागला. तसेच भारतीय सामर्थ्याचा परिचय झाल्यावर भारत त्या सामर्थ्याने आपल्याला जगात एवढा मोठा करता येईल की " समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ? "

( ४९ ) भारताचा पुन्हा महाभारत करण्यासाठी खेडेगाव, प्रत्येक खेडेगाव हे आपली प्रयोगशाळा करणे जरूर आहे. मग शहराशहराचा कारखाना होईल. तशा अठरा कारखान्यांतून देशाची इमारत उठेल. तसे करताना भारतीयत्वाची जपणूक सकसपणे करून आपल्या जवळ-लांबच्या शेजाऱ्यापासून व हितचिंतकापासून, फार काय, हितशत्रूपासूनही आपण पुष्कळच शिकू व ते भारतीयत्वात मुरवूनही घेऊ. आपण पूर्णतेकडे वाटचाल करण्यास आणि ' हे विश्वचि माझे घर ' म्हणून विश्वाला आर्य करण्यास सहकार-समन्वयाचा तो मार्ग स्वाभिमानाच्या रुळाने साफसूफ करून घेण्यास काहीच हरकत नाही.

( ५० ) भारताच्या नवजीवनासाठी बुद्धिमंतांनी, शक्तिमंतांनी आणि भाववंतांनी आपल्या सर्व ईश्वरी " देण्यासह " पुढे आले पाहिजे. प्रत्येक बारीक गोष्टीतही माणुसकीच्या गहिवराने काम केले पाहिजे.

( ५१ ) आपला जप " सुधारणा नसून " नवचैतन्याचे संचालन हा आहे. आपल्याला धर्माची संस्थापना करावयाची आहे. प्रत्येक व्यक्तिव्यक्तीला तेजस्वीपणाने जगता आले पाहिजे. आणि समाजातील, राष्ट्रातील, जगातील तेजस्वियांचा तेजोभंग न होईल अशी खबरदारी घेतली पाहिजे. ह्या दोन्ही गोष्टींचा कस ' माणुसकी ' हा असून तिच्या परिपोषाने दिव्यत्व, देवत्व आणि अमरत्व आपल्याला साधावयाचे आहे. ' जो परोपकार करीतच गेला पाहिजे तो त्याला, म्हणून देह परोपकारी झिजवून । कीर्तिरूपे उरवावा ॥ ' ही वृत्ती आपण आपला स्वभावच करून सोडली पाहिजे.

( ५२ ) मोक्ष मिळवावयाला दिलखुली अंतःकरणे लागतात. ज्यांच्याजवळ ती असतात त्यांना मोक्ष मिळाल्याशिवाय रहातच नाही.

मग तो मोक्ष आध्यात्मिक असो, राजकीय असो की दुसरा कसलाही असो !

( ५३ ) हिंदुस्थानच्या मोठेपणाकरिता जो झटतो, झिजतो, जिंकतो तो आपल्या विरुद्ध पंथाचा वा परंपरेचा का असेना, त्याचा आपला जिव्हाळा एक. तो निर्माण होण्यासाठी आपण आपल्यात व दुसऱ्यात समानता किती आहे यावर भर देऊन कार्य करीत रहावे.

( ५४ ) शिक्षक, मार्गदर्शक, सन्त, महन्त, साधू, मठपती संप्रदायाचा प्रवर्तक हा आपापल्या इष्ट विषयात निष्णात हवा यात शंकाच नाही. पण त्या निष्णातीपेक्षाही त्याचे शील आणि हाती घेतलेल्या कार्यावरील निष्ठा सर्वथैव संशयातीत हवीत.

( ५५ ) स्वामी विवेकानंदांचा जगाला आदेश काय होता, हे, तुम्हांला मजपासून हवे ? ऐका तर—

**" उत्तिष्ठत, जाग्रत, प्रयत्नान् कुरुत !**
**विहनैः पुनः पुनरपि प्रत्यहन्यमानाऽपि**
**प्रारब्धं मा परित्यजत ।। उत्तोत्तमजना**
**भूत्वा ध्येयं साधयत देहं वा पातयत ।। "**

( ५६ ) शिकणाऱ्या शिष्याने जे स्वतःच केले असते तेच त्याला आयते तयार करून देणारे, शिकणाऱ्याचे वाटोळे करतात आणि आपण त्याचे कल्याणकारी आहोत, हा दावा त्यांना सांगताच यावयाचा नाही.

( ५७ ) पक्का माल निर्यात करण्याचे बंद करीत आणून जो देश कच्चा मालच उत्पादन करण्यावर भर देत राहतो, त्याचे आकाश फाटलेच म्हणून समजावे ! जो देश स्वतःच्या गरजांपुरताही पक्का माल तयार करू शकत नाही आणि जीवनावश्यक वस्तूंसाठी इतर देशांकडे

तोंड वेंगाडत असतो, त्याला व्यवहारतः कंगाली कवटाळतच असते. म्हणून माणसे असतील त्यांनी आपल्या देशात व आपल्या देशाची स्वावलंबनसूत्रावर नेहमीच नवी नवी मांडणी करीत रहावे लागते. चैत्रगौरींच्या निरनिराळ्या घरांतील आराशीपासून हा बोध घेतला पाहिजे. सुगरिणीचा चवदार निर्माण-पराक्रम आणि शोभिवन्त मांडणी यावरून एवढाही कित्ता देशधुरीणांनी घेऊ नये ?

( ५८ ) आपल्या प्रियतमांच्या कल्याणासाठी दुसरी मंडळी खुशाल परमेश्वराची करुणा भाकोत. मी आणि माझे म्हणून जे जे आहेत, ते सर्व राष्ट्राच्या हिताकरताच परमेश्वराची प्रार्थना करतील.

( ५९ ) " दे टोले जोवरी असे तप्त, लाल लोखंड। येईल आकारास कसे झाल्यावरि ते थंड ? " पण हे टोले द्यावयाची नेमकी जागा दाखवणारी स्वच्छ स्वच्छ दृष्टी आम्हांला हवी आहे. आणि त्या दृष्टीच्या जोडीला ? हवे आहे ना, आमच्याच लोकांचे, मायभूमीच्या सान सोनुकल्यांचे, ' जे का रंजले गांजले ' त्यांचे नितान्त पाठबळ ! त्या दोहो गोष्टींच्या जोरावरच दिलेल्या टोल्यांचे सार्थक होणार आहे. अपयश हे येणारच नाही. कारण त्या दोन गोष्टींतूनच भविष्याचा बलभीम आमच्या पाठीशी राहील.

( ६० ) संघटित चिकाटी आणि निष्ठावन्त प्रचार यांचा स्वदेशीच्या यशात मोठा वाटा असतो. परदेशी मालावर " भारतात तयार " अशी चिठ्ठी कोठे लागली नाही ना, हेसुद्धा डोळ्यांत तेल घालून पाहिले पाहिजे. " स्वल्पममि धर्मस्य त्रायते महतो भयात्। " हा अनुभव स्वदेशीच्या क्षेत्रात हटकून येतो.

( ६१ ) छोट्या छोट्या दुकानांच्या जाळ्याजाळ्यांच्या खिकीतून असणारा मालाचा मांड ही खरोखर सर्वात मोठी त्या मालाची जाहिरात असते.

( ६२ ) विरोध झाला की " शरणं प्रपद्ये " म्हणणारा माणूस एक मूर्ख तरी असला पाहिजे, किंवा मित्री भागूबाई तरी खास ! स्वतःच्या उत्साहाचा व आत्मविश्वासाचा अग्नी ज्याला सदैव धगधगीत ठेवता येतो तोच स्वाभिमानाने जगतो व काळाला पुरून उरतो.

( ६३ ) जगात पराभव किंवा अपयश यांचे, खरे म्हटले असता, नाव देखील नाही. स्वच्छ इच्छाशक्तीची तीव्रता अधिकाधिक जाणवणे याला माणसे पराभव किंवा अपयश असे नाव देऊन समाधान मानून घेतात. तोटा झाला याचा अर्थ ऐनजिनसी फायदा ( कदाचित व्याजासह ) लांबणीवर झुकला ! आणि प्रयत्नान्ती परमेश्वर तसा नामजपाच्या पोपटपंचीने नव्हे ! यत्न सुरू झाला की अपेक्षांनी वातावरण धुंद होते.

( ६४ ) लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे की, खडकावर फेकलेले बी देखील वाया जात नाही. खडकाच्या खबदाडात केळी आणि कमळे काय कमी उगवतात ? पेरा तसे पीक. ऊर्मीसारखी श्रमगंगा वाहिली तर यशाचे मळे पिकलेच पाहिजेत.

( ६५ ) स्वावलंबनाची संधी मिळाली की माणसाच्या आशेला पालवी फुटल्याशिवाय राहतच नाही.

( ६६ ) नैराश्य आणि उपासमार असेल तेथे आशा व तुष्टी-पुष्टी-शान्ती निर्माण करण्यात समाजसेवा आहे. " संतप्त तेही निवाले " पाहिजेत.

( ६७ ) स्वदेशीचे व्रत राष्ट्रीय सात्विकतेच्या संवर्धनाची साधना आहे. ' बहिष्कार '—परदेशी मालावरील बहिष्कार—हे एक तऱ्हेचे धर्मयुद्ध — राष्ट्रीय धर्मयुद्ध — आहे. पुरीच्या मठात वाजलेली ही घंटा

देशाने ऐकलेली आहे. आता एकही पूजाद्रव्य परदेशी असणार नाही, आणि ते " प्रोक्ष्य " करूनसुद्धा शुद्ध होणार नाही.

( ६८ ) स्वार्थसाधू सहकारी चळवळ बाजारभावाच्या स्वस्ताईकडे लक्ष देईल ! पण राष्ट्रसेवाभावी सहकारी चळवळ राष्ट्रीयत्वाचा अभिमान धरून स्वार्थत्यागाचे तेज उभारीत राष्ट्राच्या प्रतिष्ठेची पताका उंचच उंच फडकवत ठेवील. याज्ञिक हिंदुस्थान असा आहे.

( ६९ ) माणूस हा सुखाशीन प्राणी आहे ही गोष्टच खरी नाही. तसे असते, तर रानटी अवस्थेच्या सहजासहजी होणाऱ्या गोष्टीतून आणि दैववादातून तो बाहेरच पडला नसता. आपल्या गबाळ—गचाळ प्रवृत्तीवर मात करून ' उच्च, उदात्त, भव्य, दिव्य " काही मिळवावे यातच माणसाच्या माणुसकीचे बीज आहे आणि " प्रयत्नान्ती परमेश्वर " होण्याच्या ईर्षेचे रहस्य आहे.

( ७० ) आपल्या देशबांधवांनी तयार केलेला माल परकीयांनी तयार केलेल्या तसल्याच मालापेक्षा महाग पडतो, म्हणून परकीय माल खरेदी करणारा माणूस आई—गाईला मारणाऱ्या खाटकापेक्षाही नीच होय. देशद्रोहीच !

( ७१ ) माणसाने व राष्ट्राने आपल्या कमकुवती ओळखाव्या; पण अभिजात सामर्थ्याचा सारखा वापर करीत रहावा म्हणजे सामर्थ्य व तेज वाढत जाते.

( ७२ ) माणसाला व राष्ट्राला जगात प्रतिष्ठा मिळते—ती त्याच्या अचंबा वाटणाऱ्या व आदब निर्माण करणाऱ्या निर्धाराने. त्या निर्धारातील सामर्थ्य, बुद्धिमत्ता आणि एकजिनसीपणा म्हणजेच सायुध, सशक्तिक शिवस्वरूप होय.

( ७३ ) कवी निरंकुश खरा पण तो सौंदर्य व सच्चिदानंदाचा आस्वाद देत असेल तरच ! तपस्वी तऱ्हेवाईक खरेच, पण आपल्या

व्रतधारणेने स्वतःचे व राष्ट्राचे तेज वाढवीत असतील तरच ! ! पगारी प्रचारक बनून हिंदुस्थानात आलेल्या पाद्र्यांना धर्मगुरू म्हणवून घ्यावयाचा काय बरे अधिकार आहे ?

( ७४ ) हिंदुस्थानात धर्मगुरू तोच होऊ शकतो की जो परमेश्वराशिवाय कोणापुढेही करुणा भाकीत नाही.

( ७५ ) सावकार आपल्या कुळांचे हिशेब चव्हाट्यावर मांडू लागला किंवा डॉक्टर—वैद्य आपल्या रुग्णांच्या दारिद्र्याबद्दल बडबडू लागला की त्याची माणुसकी मेलेलीच आहे, असे समजावे ! गरजूचे " उणे पडू देऊ नये " ही त्याची प्रवृत्ती मावळलेलीच असते. पाद्र्यांनी परधर्मीयांच्या उणिवा ओकून ख्रिस्ताची कोकरे तयार करण्याचा आव आणणे म्हणजे केवळ खाटिकखान्याचा रस्ता दाखविणे होय. ख्रिस्ताची सत्यप्रीती व त्याग यांचा भाग तरी येथे ?

( ७६ ) राजा राममोहन रॉय यांनी सतीबन्दीसाठी प्रयत्न केले ते एकोणिसाव्या शतकात. गुरू नानकांनी चौदाव्या शतकात केलेल्या प्रयत्नांची फक्त पुस्ती होते. मानवामानवातील समानतेसाठी बंगाल्च्या चैतन्यगुरूंइतक्या कळकळीने समाजवादी पुढारी काही प्रयत्न करीत नाहीत. नानकांनी शिखांचा इतिहास घडविला, चैतन्यांनी अनार्यांना आर्यहिंदू बनविले. ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारताच्या राष्ट्रीय उत्थापनात नानक-चैतन्यांचा वारसा चालवावयाचा आहे काय ? तसे असेल, तर भारताला मातृभूमी समजून त्यांनी त्याच्या संतानांवर बंधुप्रेम केले पाहिजे, त्यांची सेवा केली पाहिजे, त्यांच्या इतिहासाचे, परंपरांचे, चालीरीतींचे जिव्हाळ्याने अर्थ समजून घेऊन लोकशिक्षण साधले पाहिजे.

( ७७ ) परस्पर सहानुभूतीवर व सहकार्यावर समाजाचे सहकार्य अधिष्ठित असते. म्हणून कोणत्याही समाजात कृतज्ञता, प्रामाणिकपणा

वा विनय नाही असे म्हणणे हा केवळ विक्षिप्तपणा असून तसे म्हणणारा अपुऱ्या दृष्टीचा साक्षीदार ठरत असतो. ते गुण आविष्कृत करण्याची रीत निरीक्षकाच्या रीतीहून भिन्न असेल, फार तर!!

( ७८ ) अनंत—हस्ते प्रभु देत जे जे !
त्याचे उणे ज्यास तयास दीजे ॥

( ७९ ) आशियायी विचारधारेचा अन् आदर्शाचा जिवंत झरा म्हणजे हिंदुस्थान.

( ८० ) जिस खानीमें पैदा होवे राम, कृष्ण, हनुमान ।
है भारतीय स्त्री । ऐसे नररत्नोंकी खान ॥

पत्नीपद हा भारतीय स्त्रीचा धर्म आहे. मातृत्व हे तिचे पूर्णत्व आहे; आणि गृहलक्ष्मीपद हे तिचे गुरुत्व आहे.

( ८१ ) गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते !

कारण घराला घरपणा येण्यासाठी घरधनिणीची दक्षता, सेवाभाव आणि स्वार्थत्याग यांचा रांधा झालेला असतो.

( ८२ ) व्यक्तीचे हित पाहताना कुटुंबाची प्रतिष्ठा, कुटुंबाचे हित पाहताना समाजाची प्रतिष्ठा; आणि समाजाचे हित पाहताना राष्ट्राची प्रतिष्ठा अबाधित राहील, याची काळजी घेणे हा हिंदुधर्माचा बाणा आहे.

( ८३ ) कौटुंबिक स्वास्थ्य हे कोणा घटकाने दुसऱ्या कोणा घटकाच्या तंत्राने चालण्यात नसून, सर्वांच्या वैशिष्ट्याचा समन्वय-सहकार साधण्याच्या कौशल्यात असते.

( ८४ ) समाजप्रवाहातील व्यक्तीचे व्यक्तित्व आणि ‘ उंबऱ्यातच वाडे बांधीत बसणाऱ्या ’ व्यक्तीचे व्यक्तित्व यांत समुद्र आणि साठलेल्या पाण्याचे तळे, इतके अंतर असते.

( ८५ ) ' यो वा . एतदक्षरंगार्ग्यविदित्वास्माल्लोकात्प्रैति स कृपणः । ' असे याज्ञवल्क्याने सांगितले आहे. जो ब्रह्मास न जाणता ह्या लोक सोडून जातो तो कृपण होय. फलेच्छेने कर्म करून रहाणारास कृपण म्हणण्याचे रहस्य असे की, व्यवहारात मोठे कष्ट करून धनार्जन करणारे स्वतःच्या सुखाकडे त्याचा फारसा विनियोग न करता दानादिक जे वित्ताचे खरे उपयोग त्यांकडेही एक कपर्दिका खर्चीत नाहीत. अशीच स्थिती मोठे कष्ट सोसून केलेल्या कर्माची फळे इच्छिणारांची होते.

( ८६ ) " डोळा देखिले सज्जन । निवारला भाग शीण ॥
धन्य झालो आता । क्षेम देऊनिया संता ॥ "

अशी वृत्ती ज्याची झाली तोच खरा सत्पुरुष. अशा सत्पुरुषाचा सहवास ' देणे ईश्वराचे ' होय.

( ८७ ) गरजेल तो पडेल काय ? गाजावाजा झालेल्या सगळ्याच गोष्टी काही महत्त्वाच्या नसतात ! पुष्कळ वेळा आवाज न करता झुळूझुळू वाहणारा समाजप्रवाहच इतिहासाचा जीवनरस ठरत असतो.

( ८८ ) मी शंभर वेळा सांगेन की जुल्म, जबरदस्ती आणि जळफळाट यांनी मने फाटतात. याच्या उलट समजूत, सहकार आणि सज्जनपणा यांनी संघटना सुदृढ होते व सहजीवन सुखाचे जाते.

( ८९ ) हिंदुस्थानला पाश्चिमात्यच काय, पण जगातील कोणत्याही स्वतंत्र राष्ट्राइतकी प्रतिष्ठा हवी, एवढेच नव्हे, तर जगाच्या कारभारात आपल्या स्थानमहात्म्याप्रमाणे हिंदुस्थानला आपली कर्तव्यप्राप्त जबाब-दारीही पेलवयास हवी.

( ९० ) मनासारखी शस्त्रसाधना करून स्वसंरक्षण व स्वदेशसंरक्षण करण्याचा मानवाचा जन्मसिद्ध हक्क परमेश्वरालाही काढून घेता येणार नाही.

( ९१ ) राजकीय, सामाजिक, आर्थिक, शारीरिक व भौगोलिक खच्चीकरण हा परकीय सत्तेचा अपरिहार्य परिणाम असतो.

( ९२ ) हिंदुस्थानच्या गरिबीविषयी कोठेच मतभेद नाही. ती तर कमालीची आहे. सर्व स्तरांतील लोकांची ऐहिक उन्नती व सुखरूप जीवनिका साधल्याशिवाय हिंदुस्थानातील राजकीय असंतोष कसा मावळणार ? ' राज्यं कालस्य कारणम् । ' निसर्गाची अमाप कृपा असलेला हिंदुस्थान सुधारलेल्या जगातील सर्व राष्ट्रांत पराकाष्ठेचा दरिद्री हं !

( ९३ ) हिंदुस्थानातील दैनंदिन जीवनास लागणारी हरएक वस्तू हिंदुस्थानात होणाऱ्या व पिकणाऱ्या जिन्नसांतून, हिंदुस्थानी लोकांच्या श्रमातून व अकलेतून आणि हिंदुस्थानातच तयार होणाऱ्या यंत्रसाधनेतून निर्माण झाली पाहिजे हे " स्वदेशीचे " ध्येय असून, तशा न होणाऱ्या वस्तूंवाचून आपण आपले जीवन बिनधोक चालवू शकतो, असे आत्मविश्वासाने जगाला हिंदुस्थानवासीयांनी पटविणे, हे " बहिष्काराचे " रहस्य आहे.

( ९४ ) धर्मकारणात कोणीही स्वतःला हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, यहुदी म्हणवीत असला तरी राजकारणात सर्वांनी निरपवाद भारतीय म्हणूनच बोलले, चालले, वागले पाहिजे. भारतीय इतिहासातील राम-कृष्णांच्या परंपरांचा अभिमान सांगताना मुसल्मानादिकांना कमीपणा वाटण्याचे कारण नाही; मुसल्मानी राजवटींनी हिंदू लोकांच्या आधारावरच आपली शेखी गाजविली हे हिंदूही विसरू शकत नाहीत.

( ९५ ) तत्त्वज्ञान, आचारसंहिता आणि जीवनसाधना यांची आखणी विवेकश्रेष्ठीच जगभर करीत असतात. पण त्या सर्वांचा वापर करणारांकडूनच त्यांचे खरे मूल्यमापन जगाच्या नजरेने होत असते.

( ९६ ) शिस्त, शान्ती आणि स्वास्थ्य ही समाजस्थैर्याची व समर्थ शासनाची लक्षणे आहेत. पण राष्ट्राच्या जिवंतपणाला तेवढेच बस्स होत नाही. कसलाही प्रतिकूल झोत आला तरी त्याला भीक न घालणारी दमदार वृत्ती, सर्व प्रकारचे श्रम आणि कष्ट उपसण्याची " अंतरीची उबळ, " कसल्याही दिव्यातून जावे लागले तरी निश्चितार्थापासून तसूमात्र न ढळणारा धीर, अशक्यप्राय अशा वाटणाऱ्या प्रसंगातही स्वदेशसेवा या आपल्या व्रताच्या सांगतेसाठी शिस्तशीरपणे स्वतःच्या अंगातील शेवटचाही रक्ताचा थेंब देण्याची मनोवृत्ती, या व अशा गुणांनीच राष्ट्रीय जीवनाचा रसरशीतपणा प्रतीत होत असतो.

( ९७ ) खिस्तापूर्वी किती तरी शतके, हिंदुस्थानात एक नवलपूर्ण सुधारणा नांदत होती, मनाला आजही थक्क करून सोडणारे वाङ्मय निर्माण झाले होते, सुसंबद्ध अशी समाजरचना बांधण्यात येऊन समाजजीवन स्थायीपणे प्रवाही व प्रभावी होते. नियमबद्ध शासनव्यवस्था होती, लोकांना परस्पर व्यवहारात व राज्यकर्त्यांकडून बजावून घ्यावयाचे हक्क होते; आणि ह्या सर्वांपेक्षा माणुसकीच्या पायावर उभारलेले व्यक्तिस्वातंत्र्य व कर्तव्यप्रणालीही होती. या इतिहासाचा अभिमान हिंदूंनी, भारतीयांनी जरूर धरावा, पण तेवढ्यानेच स्वस्थ न बसता त्या इतिहासासारखा नवा इतिहास आपल्या काळचाही नव्याने घडवावा.

( ९८ ) वेदान्ताच्या चर्चेपेक्षा व तत्त्वज्ञानाच्या काथ्याकुटापेक्षा सन्तचरित्रांचे यथार्थ दर्शन हे परमार्थाने भवसागर तरून जाण्याचे आग्नियान आहे.

( ९९ ) नितान्त ईश्वरनिष्ठा, सरळ व शांत स्वभाव, निगर्वी वृत्ती, मितभाषण आणि कार्यतत्परता ज्यांच्या अंगी असतील, तेच संसारी दक्ष पण परमार्थी लक्ष लावून करून अकर्ते किंवा निष्काम कर्मयोगी होऊ शकतील.

( १०० ) आत्मा नसलेला माणूस म्हणावे केवळ पशूच ! आत्मा नसलेले राष्ट्र म्हणजे " मुकी बिचारी कुणी हका ! " अशा मेंढरांचा केवळ कळप ! शृंखला या सोन्याने मढविलेल्या असल्या तरी त्या शृंखलाच ! स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि प्रतिष्ठा यांची तुला जगातील सर्व संपत्ती एकवटून तरी होऊ शकेल काय ? एखाद्याला जगाचा एकमेव अधिपती केले पण त्याचा आत्माच तेवढा काढून घेतला तर काय उपयोग ?

( १०१ ) उग्र आणि आक्रमक दलाबद्दल सहानुभूती बाळगणारे आणि त्या दलाच्या पराक्रमांनी व विजयांनी हुरळून जाऊन खुदखुदणारे लोक कमी नसतात; वाटेल तेवढे भरपूर असतात. पण त्या दलाला कोणत्याही प्रकारे कसलेही साहाय्य करावयास एकही तयार नसतो. लग्नातल्या " मिष्टान्ना " वर जशी इतरेजनांची नजर तशीच राज्यकर्त्यांची जिरवणारांच्या यशावर कर्तृत्वशून्य गप्पीदासाची असते. कायद्याच्या अंतिम टोकावरून सनदशीरपणे सत्ताधाऱ्याच्याविरुद्ध दंड थोपटणारांची कड घेऊन काही माणसे खासगत बोलत असतात. पण विराटपुत्र उत्तराप्रमाणे त्यांची स्थिती असते. ते त्यांचे वाचिवीरत्व सत्ताधाऱ्यांच्या रोषाचा शक्तिमान, उमटेल, इतक्या बेताच्या मर्यादेतच असते.

( १०२ ) संपूर्ण स्वातंत्र्याचे किंवा मोक्षाचे नाजूक रोपटे तरारते, टवटवते, फोफावते ते हुतात्म्यांच्या सर्वस्वसमर्पणाच्या खतपाण्यानेच !

( मॉडर्न रिव्ह्यू ' बंगाली वगैरे मासिकांतील लेख ' मी पाहिलेले माझे गुरू ' ' भारतीय जीवनाचे जाळे ' वगैरे भगिनी निवेदितांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या आधारे. )

★

## बद्ल स्वयंप्रेरित हवा

‘ हिंदू स्त्रीला लाभणारे सौख्य, तिचे असलेले समाजातील महत्त्व आणि तिचे श्रेष्ठ चारित्र्य या गोष्टी आपल्या राष्ट्रीय जीवनातील एक श्रेष्ठ ठेवा आहेत. आमच्या आता लक्षात येऊन चुकले आहे की, धर्माच्या बाबतीत आम्हांला पश्चिमेकडून काहीच घ्यावयाचे नसून उलट, त्यांनाच आम्ही पुष्कळ द्यावयाचे आहे. सामाजिक बाबतीत आमच्यात जो बदल व्हावयास पाहिजे तो आम्हांस कळतो. तो घडवून आणण्याची पात्रता आमची आमच्याजवळ आहे. कोणाही परकीयाला त्यासंबंधात आम्हांला उपदेश करण्याची गरज नाही. जीवनात बदल हे असणारच, किंबहुना जीवन व बदल एकमेकांपासून वेगळे काढताच येणार नाहीत. पण हा बदल अंतरातून स्फुरलेला, स्वयंप्रेरित व स्वपरिश्रमांनी साधलेला असावा. ’

—( १९०२ च्या फेब्रुवारी महिन्यात मद्रास येथे मिळालेल्या मानपत्र-समारंभातील भाषणातून. )

## हिंदुस्थानातील मुसलमानांचे कर्तव्य

‘ आजच्या मुसलमानांचे कर्तव्य काय? अरबस्थानाशी मनाचे धागे जुळवीत बसावे हे नाही. त्याची आवश्यकता नाही. ते धागे रक्तातच आहेत. आज हिंदुस्थानशी नाते जुळवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाशी, जो हिंदुस्थान त्याच्याशी असलेल्या रक्ताच्या नात्यामुळे, अथवा आपण होऊन स्वीकृत केल्यामुळे, अथवा येथील लोकांच्या औदार्यामुळे, तुम्हा सर्वांचे घर झाला आहे, त्याच्या राष्ट्रीय विचारांशी नाते जुळवलेच पाहिजे. ’

१९०४ मार्च, कलकत्ता येथे मुसलमानांच्या सभेत ‘ आशियातील इस्लाम ’ या विषयावर झालेल्या भाषणातून.

## भगिनी निवेदिता व राष्ट्रध्वज

' ध्वज हा स्वजनांना आशीर्वाद देणारा व शत्रूच्या छातीत धडकी भरवणारा असतो. ध्वज हा समर्पणाचा अधिकारी असतो व एकत्वाला आवाहन करणाराही असतो........

राष्ट्रीय ध्वजासाठी आम्ही एक चिन्ह ठरवले आहे. ते म्हणजे वज्र ! एक नमुन्याचा ध्वजही आम्ही तयार केला आहे. चिनी ध्वज मनासमोर ठेवून वेड्यासारखे तांबड्या वस्त्रावर काळे चिन्ह असावे असे मी ठरवले, पण हिंदुस्थानच्या मनाला त्यात प्रेरणा नाही म्हणून आता भगव्या वस्त्रावर पिवळे चिन्ह काढणार आहोत.

—( कु. मॅकलिऑड यांना ५-२-१९०५ साली लिहिलेले पत्र )

हिंदुस्थानचा ध्वज भगवाच असला पाहिजे हे भगिनी निवेदितांनासुद्धा १९०५ साली उमजले होते.

## संघटित व्हा

स्वत:मध्ये क्रांती घडवून आणण्यात हिंदुधर्माइतका प्रभावी धर्म नाही. भूतकाळात जे धर्म, संस्कृती याला प्रतिस्पर्धी म्हणून उभ्या राहिल्या त्या सर्वांना हिंदू धर्माने पोटात घालून स्वत:ला सामर्थ्यसंपन्न केले. परंतु आता आत्मरक्षण एवढेच आपले कार्य नाही तर आम्ही दुसऱ्यांना आपल्या धर्मात आणले पाहिजे. दीर्घकाळपर्यंत हिंदुधर्मावर आघातामागून आघात होत गेले. आजचे आक्रमणशीलत्व त्यातूनही प्रत्ययास येत आहे. हिंदुस्थानची मूळ प्रेरणा आध्यात्मिक असली तरीही राष्ट्रीयत्वाचे सूर भारताला हृदयंगम वाटतात यात शंका नाही. जे आचार-विचार माणसामध्ये भेद निर्माण करतात त्यांत वास्तविक धर्म नाही. आज सर्व भेदांचा नाश करून एकत्व आणणाऱ्या संघशक्तीची आवश्यकता आहे. हा संघमंत्रच हिंदुजातीची प्राणशक्ती जागृत करील.

( १९०३ च्या फेब्रुवारीत कलकत्त्याला झालेल्या ' ज्वलंत हिंदुधर्म ' या विषयावरील व्याख्यानातून )

# चरित्र आणि कार्य

सन १८६७ माहे ऑक्टोबर दिनांक २४ हा भगिनी निवेदितेचा जन्मदिवस. ही मूळची आयर्लंडची. हिचे मूळ नाव 'मार्गारेट एलिझाबेथ नोबल'. हिचे आजोबा पाद्री व वडीलही पाद्री. खिस्ती धर्माचा उपदेश करणारे भटजीमहाराज ! सॅम्युअल रिचर्ड नोबल हे हिच्या वडिलांचे नाव. आईचे नाव मेरी इसॅबेल नोबल. या दोघांच्या पोटी अल्स्टर शहरी ही जन्मास आली. फार बुद्धिमान आणि निश्चयी मुलगी.

सहा वर्षांची झाली मार्गारेट. तिला घेऊन तिचे आई-बाप इंग्लंडात गेले. तिथे ती शिकली. सोळा वर्षांची झाली तेव्हा तिचे वडील देवाघरी गेले. आई, दोन भावंडे अन् मार्गारेट ! ! आला दिवस काढायचा कसा त्या कुटुंबाने ? तेव्हा मार्गारेटने एक शाळा काढली. ती त्या शाळेची मुख्य झाली. चांगले बस्तान बसले तिचे. ती २८ वर्षांची झाली. १८९५ साल होते ते.

तेव्हा स्वामी विवेकानन्द इंग्लंडात गेले होते. बंगालमधला हा साधुपुरुष. मार्गारेटची व या महापुरुषाची गाठ पडली. विवेकानंद म्हणजे हिंदुधर्माचा, वेदांचा, भारतीय संस्कृतीचा स्वामी. त्याच्या वागण्याची, बोलण्याची, समजावण्याची छाप पडली मार्गारेटवर ! तिने त्या स्वामीची शिष्या व्हावयाचे ठरविले. पण परीक्षेवाचून कोण कुणाला शिष्य करून घेणार ? विवेकानंदांनी तीन वर्षे मार्गारेटची परीक्षा केली आणि मग तिला हिंदुस्थानत आणली.

मार्गारेट २८ जानेवारी १८९८ रोजी हिंदुस्थानात आली. ती विवेकानंदांच्याबरोबर भारताच्या यात्रा करू लागली. शेवटी ८ मार्च १८९९ रोजी तिला विवेकानंदांनी शिष्या करून घेतली. कलकत्त्यास ती बोस-पारा गल्लीत राहात असे. पुराणप्रिय मंडळींची ती वस्ती. पण तिथल्या सनातनी बायकांच्या कसोटीला उतरली मार्गारेट. विवेकानंदांचे गुरू रामकृष्ण

परमहंस. त्यांचा मठ विवेकानंद वगैरे शिष्य चालवीत. तेथे मग मार्गारेटचा प्रवेश झाला. वैदिक धर्म, भारतीय परंपरा आणि भारतीय स्त्री-जीवन यांचे पावित्र्यच जणू अशी ती वागे. त्यामुळे "सर्वस्वी भारताला वाहिलेली" अशी ती झाली. म्हणून ती "निवेदिता" या नावाने प्रसिद्ध झाली. भारतासाठी तिने आपली आई-भावंडे, आपला देश, आपला धर्म, सगळे काही सोडले. ती स्वतःच संपूर्णपणे भारतीय झाली.

भगिनी निवेदितेचे गुरू स्वामी विवेकानंद ४ जुलै १९०२ रोजी परलोकवासी झाले. तेथपासून निवेदितेने स्वतंत्रच कार्य उभारले. १९०२ ते १९०७ तिने भारताची पदयात्रा केली. बंगालचे तरुण या कालात इंग्रजी राज्यावर उलटले होते. त्यांच्या संघात भगिनी निवेदिता सामील झाली. तिच्या जन्माच्या वेळेला, १८६७ साली, आयर्लंडात क्रांती होत होती. त्यामुळे तिला क्रांतीचे बाळकडू होते. तेच तिने बंगाली तरुणांना पाजले.

लॉर्ड कर्झन त्या काळात हिंदुस्थानात इंग्लंडच्या राजाचा प्रतिनिधी होता. पांडवांच्या वेळचा कीचकच आठवावयाचा लोकांना! अशी होती लॉर्ड कर्झनची कारकीर्द! त्याने १९०५ साली बंगालची फाळणी केली, हिंदु-मुसलमानांत भांडणे लावली; त्याच्या मिजाशीवर बंगाल खवळला; हिंदुस्थान पेटला! लोकांनी स्वदेशीची चळवळ केली व परदेशी मालावर बहिष्कार घातला. परदेशी सरकारच उडवून लावावयाचे असे बेत भारतीय तरुण करू लागले. त्यांतल्या बंगाली तरुणांच्याबरोबर भगिनी निवेदिता इंग्रजी राज्याला सतावू लागली!!!

सन १९०७ च्या ऑगस्टमध्ये बंगाली तरुण शस्त्रधारी झाले. बंगालमध्ये अनुशीलन संस्थेचे बॉम्ब उडू लागले. निवेदिता त्या वेळी इंग्लंडात होती. हिंदुस्थानातील तरुणांचा इंग्रजी राज्याबद्दलचा असंतोष ही इंग्रजी राज्यकर्त्यांना व जनतेला पटवून देत होती. उपयोग काय? हिंदुस्थानात दडपशाही सुरू झाली. लोकमान्य टिळकांना मंडालेची शिक्षा झाली; कित्येक क्रांतिकारक हिंदुस्थानातून बाहेर पडले. शंभराच्यावर क्रांतिकारक अंदमानाचे हाल भोगू लागले! स्टूटगार्ड येथे मादाम कामा यांनी जगाला स्वतंत्र हिंदुस्थानचे निशाण फडकवून दाखविले! बाबू अरविंद घोष यांना पकडण्या-

साठी इंग्रज टपून बसले होते. पण ते इंग्रजाहाती कोठून लागणार ? १९०९ साली भगिनी निवेदिता भारतात परतली. तिने अरविंदबाबूंना चंद्रनगरला गुपचूप पोहोचविले होते, बेमालूमपणे !

भारतीय चित्रकलेचीही निवेदितेने सेवा केली. वैदिक संस्कृतीची विचार-धारा आपल्या प्रत्येक कृतीत आणि पुस्तकात तिने प्रकट केली.

भारतात तिचा असा सेवाभावी कर्मयोग होता. त्याचा शेवट १३ ऑक्टोबर १९११ साली सकाळी ७ वाजता झाला. कारण त्या वेळी भगिनी निवेदिताने भारतमातेच्या मांडीवर शेवटची व कायमची डोई ठेवली !



अहो, हे तर नामदार गोखले. या गोखल्यांच्या गोष्टी कऱ्हाडचे श्री. पु. पां. गोखले यांनी अशा लिहिल्या आहेत की, मुलांना नामदार गोखल्यांसारखे मर्यादापुरुषोत्तम व्हावेसे वाटेल. प्रसंग छोटे पण त्यांतील अर्थ मोठा. सुबोध भाषेत लिहिलेले हे पुस्तक अवघ्या साठ पैशांत मिळते. गोखले--आगरकर — सातवळेकरांप्रमाणेंच रानडे — टिळक-प्रभृतींच्याही गोष्टी मुलांना गोखले देत आहेत, त्या कित्ता घेण्यासारख्याच आहेत.